मराठी साहित्याला सरस्वतीने दिलेले वरदान म्हणजे ग.दि.माडगूळकर, ग.दि.माडगूळकर हे विख्यात मराठी कवी व पटकथा – संवाद लेखक होते. त्यांचे शिक्षण आटपाटी, कुंडल आणि औंध येथे झाले. गणित विषयामुळे मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. पुढे घरच्या गरीबीमुळे चरितार्थासाठी चित्रपटव्यवसायात आले. त्यांना लहानपणापासून लिहिण्याची, नकला करण्याची आवड होती. तिचा येथे उपयोग झाला. हंस पिक्चर्स ह्या चित्रसंस्थेच्या, मा. विनायक दिग्दर्शित ब्रह्मचारी (१९३८) ह्या गाजलेल्या चित्रपटात काही छोट्या भूमिका करून माडगूळकरांनी आपल्या चित्रपटक्षेत्रातील कारकीर्दीचा आरंभ केला. सुप्रसिद्ध साहित्यिक वि.स.खांडेकर यांचे लेखनिक म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. त्या निमित्ताने खांडेकरांच्या संग्रहातील पुस्तके त्यांना वाचावयास मिळाली. खूप लिहावेसे वाटू लागले. त्यांच्या कविता लेखनालाही वेग आला. नवयुग चित्रपट ह्या चित्रसंस्थेत के. नारायण काळे ह्यांच्या हाताखाली साहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करण्याची संधी माडगूळकरांना मिळाली. तसेच आचार्य अत्रे ह्यांच्या सोप्या पण प्रसिद्ध गीतरचनेचा आदर्श त्यांच्या समोर राहिला.

नवहंस पिक्चर्सच्या भक्त दामाजी (१९४८) आणि पहिला पाळणा (१९४२) ह्या चित्रपटांची गीते लिहिण्याची संधी मिळाली. पुढे राजकमल पिक्चर्सच्या लोकशाहीर रामजोशी (१९४७) ह्या चित्रपटाची कथा संवाद आणि गीते त्यांनी लिहिली. त्यात एक भूमिकाही केली. ह्या चित्रपटाला फार मोठी लोकप्रियता लाभली. त्यानंतर कवी आणि लेखक अशा दोन्ही नात्यांनी माडगूळकर हे मराठी चित्रपटसृष्टीचा एक भक्कम आधार बनले. गीतकार, कथा संवादकार आणि अभिनेते म्हणून दीडशेहून अधिक मराठी आणि कथा संवादकार म्हणून पंधरा हिंदी चित्रपटांसाठी त्यांनी काम केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेली गीते चैत्रबन (१९६२) ह्या नावाने संग्रहित आहेत. तसेच त्यांनी लिहिलेल्या काही मराठी चित्रकथाही पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्या आहेत. (तीन चित्रकथा १९६३).

मराठी शब्दांना अजरामर किंबहुना त्याला अक्षराचा साज चढवून प्रत्येक शब्द ओळ न् ओळ जिवंत करणारा हा आधुनिक काळातला वाल्मिकी केवळ कविता, गाणी, पटकथा, संवाद एवढंच नाहीतर कलाकार बनून भूमिका साकारणारे ग.दि.मा. एक शब्दांचा महासागर या शब्दप्रभूला शब्दांत अंकित करण्याचा हा साधा प्रयत्न आहे. माडगूळकरांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आदि संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले आहे. त्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या सोप्या परंतु प्रभावी गीतांतूनही येतो. त्यांच्या कवितेतील अस्सल

मराठमोळेपणामागेही हेच संस्कार उभे असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे लोकगीतांच्या लोभस लयतालांनी त्यांची गीते नटलेली असत. उत्तम समरगीते आणि बालगीतेही त्यांनी लिहिली. मराठी रसिकांनी माडगूळकरांच्या काव्यरचनेला मनःपूर्वक प्रतिसाद दिला. आणि त्यांच्या गीतरामायणाने तर कीर्तिचा कळस गाठला. त्यांना 'महाराष्ट्र वाल्मिकी' ही सन्माननीय पदवी लोकांनी स्वयंस्फूर्तीने दिली. गीतरामायणाच्या गायनाचे शेकडो कार्यक्रम झाले आणि अजूनही होत आहेत. अन्य भारतीय भाषांत त्याचे अनुवादही झाले.

गीतरामायण

ग.दि.माडगूळकर हे आधुनिक काळातील मराठी भाषेतील अग्रगण्य साहित्यिक होते. संत, कवी नसले, तरी त्यांचे गीतरामायण फार लोकप्रिय आहे. गीतरामायण हे रामायण प्रसंगावर आधारित ५६ मराठी गीतांचा संग्रह. हे गीतरामायण आकाशवाणीला पुण्यात १९५५–५६ मध्ये प्रसारित केले. गीतरामायण हे गदिमांनी लिहिले आणि सुधीर फडके यांनी संगीत दिले. त्याकाळी ते खूप प्रसिद्ध झाले. त्यांचे अनुवाद अनेक भाषांमध्ये झाले.

गदिमांनी रामायण रचून वाल्मिकींच्या शब्दांना सुरात गाता येईल असे गुंफिले. सुधीर फडक्यांनी सप्तसुरांचं कोंदण दिले आणि गीतरामायणांनी इतिहास घडविला. स्वये श्रीरामप्रभू ऐकती ही उक्ती खरंच वास्तवात उतरली. आज गदिमांचे शताब्दी वर्ष आहे, प्रत्येकाच्या चैतन्यातला राम अजूनही ते रामायण, ती गाथा, ते कवन ऐकतोय. तोच भाव, तीच श्रद्धा ठेवून, समाजमनाला एक सुखाचा, आनंदाचा ऊर्मीचा ठेवा सतत देणारा, तत्त्व आणि जगण्याची कला शिकवणारा. जीवनातील तत्त्व साध्या शब्दांतून रंगवणारा, हा अद्‌भुत शब्दकवी, शब्दांचा जादूगार, या गदिमांबद्दल कितीही लिहिले तरी शब्दांत गवसणार नाही. अशा या शब्दप्रभूला मानाचा मुजरा.

श्री. सुधीर फडके (बाबूजी) – श्रेष्ठ संगीतकार

सायली शंकर कांबळे (एम.ए. मराठी –द्वितीय वर्ष

रामचंद्र विनायक फडके उर्फ सुधीर फडके यांचा जन्म कोल्हापूर येथे २५ जुलै १९१९ रोजी झाला. सुधीर फडके हे महाराष्ट्रातील संगीतकार व गायक होते. त्यांना त्यांचे चाहते बाबूजी या नावाने ओळखतात. फडकेंच्या आईचे नाव गायिका सौ. ललिता देऊळकर–फडके आणि वडील विनायक फडके हे होय.



सुधीर फडके यांनी मराठी चित्रपटसृष्टीवर साधारण ५० वर्षे राज्य केले. बाबूजींनी शास्त्रीय गायनाचे प्राथमिक शिक्षण हे कोल्हापूरच्या कै. वामनराव पाध्ये यांच्याकडे घेतले. त्यांनी आपल्या या कारकीर्दीची सुरुवात १९४१ साली एच.एम.व्ही. या संगीत क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेतून केली. १९४६ साली ते पुण्याच्या प्रभात चित्र संस्थेत संगीत दिग्दर्शक म्हणून रुजू झाले. तिथे त्यानी अनेक हिंदी, मराठी चित्रपटांना संगीत दिले. तसेच अनेक चित्रपटांसाठी पार्श्वगायन सुद्धा केले. त्यांच्या कारकीर्दीतील सर्वोच्च क्षण म्हणजे त्यांनी १९६० च्या दशकात स्वरबद्ध केलेले गदिमांचे गीतरामायण. गीतरामायणाचे कार्यक्रम तेव्हा रेडिओवर (All India Radio) वर्षभर प्रसारित होत होते. आजही त्यांचे प्रयोग अफाट गर्दी खेचत आहेत. आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस त्यांनी 'वीर सावरकर' या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनातील हिंदी चित्रपटाच्या निर्मितीत लक्ष घातले. हा चित्रपट जनतेकडून जमा केलेल्या वर्गणीतून निर्माण करण्यात आला होता. बाबूजींनी पार्श्वगायन केलेला व संगीत दिलेला हा शेवटचा चित्रपट होय. या चित्रपटाच्या निर्मितीसाठी सुधीर फडके यांनी अफाट श्रम केले. या सर्व इतिहासाची माहिती देणारे पुस्तक प्रभाकर मोने यांनी लिहिले आहे. पुस्तकाचे नाव – स्वातंत्र्यवीर सावरकर चित्रपट – एक शिवधनुष्य (परचुरे प्रकाशन २००४).

कै. सुधीर फडके हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जवळजवळ ६०वर्षे होते. तसेच अमेरिकेमध्ये इंडिया हेरिटेज फाऊंडेशनच्या स्थापनेमागे त्यांचीच प्रेरणा होती.

बाबूजींनी एकूण १११ चित्रपटांना संगीत दिले. त्यापैकी २१ चित्रपट हे हिंदी भाषेतील गाजलेले चित्रपट आहेत. त्यांपैकी काही चित्रपट पुढीलप्रमाणे – गोकूळ (१९४६), आगे बढो (१९४७), सीता स्वयंवर (१९४८); अपराधी, जयभीम, माया बाजार, रामप्रतिज्ञा, संत जनाबाई (१९४९), श्रीकृष्ण दर्शन (१९५०); मालती माधव, मुरलीवाला (१९५१), पहली तारीख (१९५४), रत्न घर (१९५४), शेवग्याच्या शेंगा (१९५५), देवघर, सजनी (१९५६), गजगौरी (१९५८), गोकुल का चोर (१९५९), भाभी की चूडियां (१९६१),

प्यार की जीत (१९६२), एकटी (१९६८), आधार (१९६९), दरार (१९७१), शेर शिवाजी (१९८१), रुक्मिणी स्वयंवर, आम्ही जातो आमुच्या गावा, पुढचे पाऊल, जगाच्या पाठीवर, सुवासिनी, प्रपंच, आणि मुंबईचा जावई.

बाबूजींनी एक गायक म्हणून अनेक हिंदी व मराठी चित्रपटांमध्ये पार्श्वगायन केले. त्यापैकी काही अतिशय गाजलेली मराठी गीते पुढे दिली आहेत. यातील काही चित्रपटांत नसलेली भावगीतेही आहेत.

भावगीते – अंतरी गूढ गर्भी, अशी पाखरे येती, कुठे शोधिसी रामेश्वर, डाव मांडून मांडून मोडू नको, तुझे गीत गाण्यासाठी, तोच चंद्रमा नभात, दिसलीस तू फुलले ऋतू, प्रिया आज माझी नसे साथ द्याया, सखी मंद झाल्या तारका, स्वर आले दुरूनी, इ.

चित्रपटातील गाणी – आकाशी झेप घे रे पाखरा (आराम हराम आहे), जग हे बंदीशाळा (जगाच्या पाठीवर), तुझे रूप चित्ती राहो (गोरा कुंभार), देव देव्हाऱ्यात नाही (झाला महार पंढरीनाथ), देवा तुला दया येईना कशी (पाटलीण), देहाची तिजोरी (आम्ही जातो आमच्या गावा), धिरे जरा गाडीवाना (नरवीर तानाजी), नवीन आज चंद्रमा (उमज पडेल तर), बाई मी विकत घेतला श्याम (जगाच्या पाठीवर), बोलत नाही वीणा (पडदा), मानवतेचे मंदिर माझे (ते माझे घर), यशवंत हो जयवंत हो (भिंतीला कान असतात.), लाडकी शंकुतला (सुवासिनी), विठ्ठला तू वेडा कुंभार (प्रपंच), स्त्री जन्मा ही तुझी कहाणी (बाळा जो जो रे), तुज सगुण म्हणू की निर्गुण रे (संत–गीत).

सुधीर फडके यांना मिळालेले पुरस्कार

१. राष्ट्रपती पदक (१९६३) – हा माझा मार्ग एकला (चित्रपट)
२. सह्याद्री स्वररत्न पुरस्कार (२००२)
३. दीनानाथ मंगेशकर पुरस्कार (१९९८)
४. लता मंगेशकर पुरस्कार (२००१)
५. अल्फा जीवन गौरव पुरस्कार (२००१)

सन्मान –

सुधीर फडके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अनेक कार्यक्रम होत असतात. त्यांपैकी एक पुढीलप्रमाणे – पिंपरी प्राधिकरणातील मधूगंधर्व संस्थेतर्फे शाहूनगर येथे सुधीर फडके स्मृती गायन स्पर्धा.

चरित्रग्रंथ – स्वरश्री बाबूजी – लेखक वसंत वाळुंजकर

जगाच्या पाठीवर – सुधीर फडके हे आत्मचरित्र !

गीतरामायण – सुधीर फडके यांच्या कारकीर्दीतील मानाचा बिंदू म्हणजे त्यांनी स्वरबद्ध केलेले गदिमांचे गीतरामायण. गीतरामायणात एकूण ५६ गाणी आहेत. त्यामध्ये गदिमांनी रामायणातले सर्व प्रसंग अतिशय ओघवत्या भाषेत वर्णिले आहेत.

गीतरामायणांचे आजपर्यंत हिंदी, गुजराती, कन्नड, बंगाली, आसामी, तेलगू, मल्याळी, संस्कृत, कोकणी अशा विविध भाषांमध्ये भाषांतरे झालेली आहेत. या सर्व भाषांतराचे वैशिष्टये म्हणजे भाषांतरकर्त्यांनी अर्थामध्ये एका मात्रेचाही फरक केलेला नाही. ही सर्व भाषांतरे मूळ बाबूजींनी दिलेल्या चालीवरच गायली जातात.

बाबूंजींनी स्वतः त्यांच्या आयुष्यात गीतरामायणाचे जवळजवळ १८०० प्रयोग केले. हे प्रयोग त्यांनी स्वदेशात तसेच परदेशांत केले आहेत. या गीतांना ग.दि.माडगूळकरांची शब्दरचना आणि सुधीर फडके यांचे संगीत असलेली गाणी महाराष्ट्राच्या संगीत इतिहासात अजरामर झाली आहेत. असा दोन प्रतिभासंपन्न कलावंतांचा संगम क्वचितच अनुभवायला मिळतो. गीतरामायणासारखी संगीत कलाकृती पुन्हा निर्माण होण्यासारखी नाही.

दहावीतली 'ती'

बसलो होतो निवांत
विचार करीत शांत
भूतकाळाच्या विचारांत भविष्याची संक्रांत
बरसू लागले ते क्षण अंतरीच्या पावसांत
अचानक आठवली ती
हरवलेल्या सुरांच्या एकांतात
पलटू लागले पान
वही होती कोरी
कोऱ्या पानांवरती पण...
होती का माझी लव्हस्टोरी ?
पण तरी सुद्धा...

हलकेच दिसले 'ती'चे चित्र मनाच्या पडद्यावर
रोज बसायची 'ती' शेवटच्या बाकावर
तिच्यासाठी जायचो रोज केस माझे विंचरुन
समोर आली 'ती'
की जायचो सगळं विसरुन
मात्र...

'त्या' दहावीनंतर अनेक प्रश्न मनातंच विरून गेले
क्षणांच्या उंबरठ्यावरती उत्तरेही धूसर झाले

आणि मग सरतेशेवटी...
हरवलेल्या त्या वाटेवर
फक्त आठवणींची धूळ असते
पडतो पुन्हा तोच प्रश्न
ती सध्या काय करते ?


– **नारायण जाह्नवी जोशी**
(प्रथम वर्ष वाणिज्य)

GO TO INDEX

वाढते शहरीकरण देशापुढील समस्या

आदिती माने (F.Y.B.Com.)

वाढत्या लोकसंख्येप्रमाणे लोकांच्या गरजाही वाढत चालल्या आहेत. एकत्र कुटुंब पद्धत बदलत चालली असून, माणसे स्वत:ची सदनिका घेणे पसंत करत असल्यामुळे अधिकाधिक इमारती उभ्या राहाताना दिसतात. वाढते औद्योगिकरण व खेड्यांतून शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतर हेही शहरीकरणाचे कारण आहे. या



स्थलांतरामुळे शहरातील लोकसंख्या वाढत चालल्यामुळे रोजगाराचे प्रमाणही कमी होत चालले आहे. शहरीकरणामुळे मोकळी जागा कमी होत चालली आहे. तसेच मैदानेही कमी होत आहेत. वाढत्या लोकसंख्येचा समावेश करण्यासाठी गगनचुंबी इमारती उभ्या होत आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे प्रदुषणाची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यामुळे लोकांचे स्वास्थ्य बिघडले आहे. शहरीकरण, झालेल्या भागातील वृक्ष तोडल्यामुळे मोठ्या प्रमाणावर निसर्गाची हानी होत जाते. हे शहरीकरण पुढील येणाऱ्या काही वर्षांत रोखता आले नाही, तर निसर्गातील झाडे कमी होत जाऊन सगळीकडे सिमेंटचे जंगलच दिसेल.

शहरीकरणामुळे सामाजिक अवस्थेवरसुद्धा परिणाम होतो. आता शहरातून एकत्र कुटुंबपद्धती जवळजवळ नाहीशीच होत चालली आहे. सर्वजण स्वत:चाच विचार करू लागले आहेत. त्यामुळे सामाजिक बांधीलकी कमी होत चालली आहे. त्यामुळे आजकाल वृद्धाश्रमांची गरज वाढत चालली आहे. शहरांमध्ये होत असलेल्या अतिक्रमणामुळे सगळीकडे आसपास असलेल्या इमारती व चालू असलेल्या बांधकामेच जास्त करून दिसू लागली आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे अग्नी सुरक्षा व वाहतूक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. शहरीकरणामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होत आहे. ध्वनिप्रदूषण, दिवसभरातील धावपळ यामुळे शारीरिक आरोग्य व मानसिक आरोग्य यावरही विपरीत परिणाम होत असलेले दिसून येत आहे. इतरही अनेक आजार जसे की, स्वाईन फ्ल्यू, डेंग्यू, मलेरिया हे सर्व आजारांची लोकांमध्ये लागण होण्याचे प्रमाणदेखील वाढत चालले आहे. एकंदरीत यावरील सर्व समस्या आत्ताच निवारणे कठीण झाले आहे, तर भविष्यात काय होईल?

वाढत्या शहरीकरणामुळे व वाढत जाणाऱ्या लोकसंख्येमुळे घनकचरा वाढत चालला आहे. त्यामुळे याचे प्रमाण वर्षानुवर्षे वाढत चालले आहे. या घनकचऱ्याचे विघटन करणे हे एक आव्हान बनले आहे. वाढत्या शहरीकरणामुळे पाणीपुरवठा पुरवणे ही एक अडचण बनली आहे. अधिक लोकसंख्येमुळे पाणी पुरवणे अडचणीचे झाले आहे. शहरीकरणामुळे डोंगर कमी केले जात आहेत. त्यामुळे जलप्रलयाला डोंगरफोड तसेच अनियंत्रित बांधकाम कारणीभूत ठरत आहे. शहरांचा विकास करण्यासाठी उदाहरणार्थ रस्तेबांधणी व मेट्रोचे बांधकाम करण्यासाठी तलाव जलाशय बुजवले जात आहेत तसेच जलाशय प्रदूषित केले जात आहेत.

वरील सर्व कारणांचा देशाच्या विकासावर विपरीत परिणाम होत चालला आहे. या सर्व परिणामांचा बारकाईने विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. शहरीकरण आणि त्याचा वेग थोपवणे हे आता गरजेचे झाले आहे. शहरीकरणाचा पर्यावरणावर, होणाऱ्या परिणामांचा विचार करता सर्वांनीच आतापासून विचार केला पाहिजे. त्यामुळे योग्य त्या उपाययोजना अमलात कशा आणता येतील याचा विचार केला पाहिजे. त्यात शहरांबाहेरील खेड्यांचा योग्य प्रमाणात विकास करण्यावर भर दिल्यास गावाकडून शहराकडे येणारा लोंढा कमी होण्यास मदत होईल. खासगी गाड्यांचा वापर कमीत कमी करून सार्वजनिक वाहनांचा वापर केल्यास रस्त्यावरील वाहनांची गर्दी कमी होण्यास मदत होईल. यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून योग्य ती पावले टाकली तर शहरीकरणाचे दुष्परिणाम निश्चितपणे कमी होईल.

राजा शिवछत्रपती – रयतेचा राजा

श्रद्धा अशोक बोडके (XI-G)

''निश्चयाचा महामेरू । बहुतजनांस आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंतयोगी ।।''
''यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।

फाल्गुन, कृष्ण–तृतीया या शुभदिनी अंध:काराचा सर्वनाश करण्यासाठी, मोगलांपासून रयतेस वाचविण्यासाठी एका सिंहपुरुषाने जन्म घेतला! जिजाऊंच्या पोटी शिवरायांच्या रूपाने एक झळाळता, तेजस्वी सूर्य जन्मला! 'जाणता राजा' असे ज्यांना ओळखले जाते ते शिवराय लहानपणापासूनच स्वराज्याचे स्वप्न पाहू लागले. पुण्यामध्ये सोन्याचा नांगर फिरवून त्यांनी या शुभकार्यास आरंभ केला!



वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी महाराजांनी स्वराज्याच्या स्थापनेची शपथ घेतली. आणि गरजला! सह्याद्रीचा सिंह मोगलांच्या अन्यायी सत्तेविरुद्ध गरजला! मुरुंबदेवाचा डोंगर स्वराज्याची राजधानी झाली. 'राजगड' या नावाने लोक त्याला ओळखू लागले. ''गडांचा राजा आणि राजांचा गड'' अशी ज्याची ख्याती होती तो राजगड! बारा बलुतेदारांमधून मावळांतून सोबती जमवून राजांनी त्यांची लढाई सुरू केली. ''हे स्वराज्य व्हावे, ही तर श्रींची इच्छा!'' असे ते म्हणत. फतेहखान, अफजलखान, शाहिस्तेखान अशा दुष्ट शत्रूंचा सर्वनाश करून राजांनी स्वराज्याची कीर्ती साता समुद्रापार पोहोचविली. स्वराज्यातील रयतेसाठी राजे अहोरात्र झटत. रयतेच्या भाजीच्या देठालाही धक्का लागू नये असे ते मानत. रयतेचे दु:ख त्यांना सोसवत नव्हते. स्वराज्याच्या सुरक्षेसाठी महाराजांनी चारही शाह्या एकाच वेळेस थोपवून ठेवल्या. रयत सुखी राहावी म्हणून राजांनी कधीही सुखाची झोप घेतली नाही. ''रयत ही मातेसमान आहे. या रयतरूपी मातेचे रक्षण करणे आम्हास अनिवार्य आहे.'' असे होते महाराजांचे विचार!

''शिवरायांचे आठवावे रूप । शिवरायांचा आठवावा साक्षेप ।
शिवरायांचा आठवावा प्रताप । भूमंडळी ।।''

महाराजांनी संपूर्ण जीवनात कधीही स्वत:च्या सुखाचा विचार केला नाही. स्वार्थाचा महाराजांना स्पर्शही झाला नाही. रयतेसाठी महाराजांनी अभेद्य अशा गडकिल्ल्यांची बांधणी केली. त्यांनी मोगलांच्या अत्याचारापासून रयतेस मुक्त केले. रयतेला हक्काचे स्थान मिळाले. रयत स्वाभिमानाने जगू लागली. स्वराज्यप्रेमाचा अथांग सागर सर्वांच्या देहात वाहू लागला. स्वराज्यनिष्ठेची तलवार झळाळू लागली. महत्त्वाकांक्षांचा कडेलोट झाला. बेईमानी जेरबंद झाली. यत्र, तत्र, सर्वत्र शिवरायांचा जयघोष दुमदुमला! महाराज मोहिमेवर जाताना ज्या झाडांखाली बसत, ती झाडे मोहरून गेली. ज्या पाषाणांवर महाराजांचे पाय पडत, ते पाषाण पवित्र झाले. फ्रेंच, डच, सिद्दी अशा परकीय सत्ता महाराजांचा आदर करू लागल्या. सर्वत्र आनंद बहरला! स्वराज्याचे 'सुराज्य' झाले!

महाराजांच्या मायेच्या छत्राखाली रयत मनमोकळेपणाने नांदू लागली. लोक निर्धास्त जगू लागले. मायेचे छत्र होते; परंतु मोगलशाही, कुतुबशाही यांवर अजून जरब बसावी म्हणून जिजाऊंच्या सांगण्यावरून महाराज सिंहासनाच्या छत्राचे मानकरी झाले. महाराज 'छत्रपती' झाले! सात पवित्र नद्यांच्या पाण्याने अभिषिक्त झालेले शिवराय ''छत्रपती शिवाजी महाराज'' झाले. त्यांच्या नावाची राजमुद्रा तयार करण्यात आली.

''प्रतिपच्चन्द्रलेखेव वर्धिष्णुविश्ववन्दिता ।
शाहसूनो शिवस्येषा मुद्रा भद्राय राजते ।।''

रयतेवर सदैव मायेचे छत्र धरणारे छत्रपती हे जगप्रिय झाले. त्यांना पाहाण्यासाठी फिरंगी, डच, फ्रेंच अशा परदेशी लोकांची किल्ले रायगडावर दाटी होऊ लागली.

रायगडाची सदर जयघोषाने दुमदुमली.
''क्षत्रिकुलावंतस प्रौढप्रतापसुंदर
राजाधिराज योगीराज
सिंहासनाधीश्वर महाराजाधिराज
छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो!''

असा हा रयतेचा लोकमान्य, लोकप्रिय राजा स्वराज्याचा छत्रपती म्हणून प्रसिद्ध झाला!

फक्त आणि फक्त रयतेसाठीच जगणारे, झिजणारे आमचे शिवराय इ.स. १६८० साली चैत्र युद्ध पौर्णिमेच्या दिवशी स्वर्गवासी झाले. रयतेच्या दु:खाला पारावार राहिला नाही. अवघा आसमंत धाय मोकलून आक्रोश करू लागला. रयतेचे मायेचे छत्रच हरवले.

खरंच शिवरायांचा संपूर्ण इतिहास थरारून टाकणारा आहे! तो इतिहास वाचून डोळ्यांत अभिमानाचे अश्रू तरळतात! संपूर्ण जगासाठी

GO TO INDEX

आदर्श असणाऱ्या आपल्या लाडक्या शिवरायांचे विचार आचरणात आणणे आणि त्यांची शिकवण सार्थक करणे हे आजच्या काळात आपले प्रथम कर्तव्य आहे!

अशा या रयतेच्या लोकप्रिय राजासाठी मला माझ्या मनातील चार ओळी म्हणाव्याशा वाटतात.

''महाराजांच्या पदस्पर्शाने उजळला
अवघा महाराष्ट्र माझा!
स्वराज्याच्या रक्षणासाठी झटला
अखेरपर्यंत जाणता राजा!!
।। शिवछत्रपति: जयत्येजय: ।।

हृदयी छत्रपती...

सह्यगिरीचा सिंह गर्जतो कोकणकड्यावरती
दऱ्या-खोऱ्यांतून आवाज घुमतो हृदय छत्रपती
जावळीचा तो राजा जणू रुद्रअवतारी मर्द
जिजाऊंचा सुत पेलितो स्वराज्याचे दर्द
प्रतिपदेचा चंद्र वाढतो राजमुद्रेच्या ठायी
अखिल हिंदुस्तान गर्जतो शिवरायांच्या पायी
प्रतापाचा किल्ला राखितो स्वराज्याची गादी
मेल्यावरही वैर संपते कथितो ठाई ठाई
एकाच छत्राखाली राखीतो महाराष्ट्र देशा
अन्यायाला वाचा फोडीतो इतिहासाच्या वेशा
बाजी, ताना, मुरार गरजे गडकोटांच्या ठाई
मुरारचे रक्त सांडते पुरंदराच्या पायी
पावनखिंडीत मृत्युलाही समोर जाई बाजी
कोंढाण्याची ढाल रक्षितो जिद्दी तानाजी
दहाड पडता ह्या वाघाची हादरे दिल्ली तख्त
दख्खन जिंकण्या मरण पावते औरंग्याचे स्वप्न
शंभु जैसा वारस जन्मे शिवरायांच्या पोटी
मेल्यावरही प्रेम करावे शंभुतीर्थावरती
शहाजींचा सुत शोभे महाराष्ट्राचे गोत्र
मराठीचे तख्त राखिते शिवबांचे हे सुत्र
या इतिहासाला जागृत ठेव रे महाराष्ट्र देशा
मातीत मरण्या भाग्य समजते मराठीची वेशा,
इतिहासाची पाने गरजे
हृदयी छत्रपती...

– राजगुरू
(रविंद्र नागेश शिंदे, ११ वी-जे)



जय जय भारत देशा...

तुज वंदितो जय जय भारत देशा
तुची देशभक्तीच्या शुरवीरांच्या वेशा
या बुलंद बाहू खड्या ठाकती तारुण्याच्या
अमृतपदे चालूनी येती अमरत्वाच्या देशी

वंदे मातरम् नाद गर्जतो हिमालयाच्या द्वारी
स्वातंत्र्याच्या वेशीवरती सिंहाची ती स्वारी
तोफांची ती नौबत झडती निधड्या छातीवरती
इन्कलाबचा सूर्य उगवतो याच मातीवरती



तारुण्याच्या मशाली पेटती हिमालयाच्या कुशी
सिंध आमुचा खडा ठाकतो याच मातेच्या मुशी
विंध्य हिमाचल वतन आमुचे गडकोटांचे रूप
दर्याची ती बाहू आम्हां मातृत्वाचे सुख

उजव्या हाती खडा ठाकतो सह्यगिरी घाट
गंगा-यमुना लोळत फिरती पूर्वेचा तो घाट
ढाल होऊनी खडी ठाकते दख्खनची ती पाठ
आम्हीच या मातीची लेकरे हा अभिमान ताठ

टिळक गांधी आम्हां स्फूर्तीचा तो घास
भगतसिंग, सुखदेव, राजगुरू क्रांतीचा तो ध्यास
स्वातंत्र्याच्या तोफा गर्जतो सावरकरी बाणा
सीमेवरचा जवान कथितो अमरत्वाच्या खुणा


मरणालाही मरण देतो हिमगिरी हा बाप
जननी जन्मभुमीच आम्हां स्वर्गाची ती थाप
मृत्युलाही खड्या ठाकती अमरत्वाच्या वेशी
मरणालाही मांडी देतो भारत आपुल्या देशी

– राजगुरू (रविंद्र नागेश शिंदे, ११ वी-जे)

GO TO INDEX

निवडक विज्ञान साधकांचा परिचय

'तुम्ही एकटे आहात म्हणून तुम्हाला यश मिळणार नाही अशी भीती कधीच बाळगू नका...
कारण थव्याने उडणाऱ्या पक्ष्यांपेक्षा एकट्या उडणाऱ्या गरुडाची झेप ही नेहमीच मोठी असते!'



निकोला टेस्ला

वैष्णवी चिवटे (S.Y.B.Sc.)

कदाचित याच ठाम भूमिकेनुसार वागून 'विज्ञान' विश्वात स्वतःची वेगळीच प्रतिमा तयार केलेले शास्त्रज्ञ म्हणजेच 'निकोला टेस्ला' अर्थातच 'मास्टर ऑफ लाईटनिंग'.

बऱ्याच लोकांना निकोला ह्या शास्त्रज्ञाबद्दल जास्ती माहितीच नाही, फार कमी लोकांना त्यांच्या अविष्काराबद्दल माहिती आहे. त्यांचा उल्लेख एक वेडा, सणकी शास्त्रज्ञ; परंतु आजच्या या प्रगत विज्ञानाच्या जगात त्यांचाही मोठा वाटा आहे. अर्थात, त्याला त्यांच्या अव्यवहारी स्वभाव, प्रसिद्धीपासून दूर पळ काढणे, एकाकी जीवन जगणे हे कारणीभूत आहे. आठ भाषा अवगत असलेले, २६ देशांत जवळपास ३०० च्या वर पेटंट आणि असे कित्येक आविष्कार ज्यांचे पेटंट घेतलेले नाही, अशा ह्या शास्त्रज्ञाविषयी, त्यांच्या कामाविषयी, वेगवेगळ्या संशोधनाविषयी व जीवनाविषयी खालीलप्रमाणे तपशीलवार माहिती जाणून घेवूयात.

टेस्ला यांचा जन्म एका सर्बियन कुटुंबात झाला होता. निकोलाचे प्राथमिक शिक्षण १८६२ मध्ये पूर्ण झाले. अद्वितीय बुद्धिमत्ता असलेल्या निकोलाने सन १८७३ मध्ये चार वर्षांचे शिक्षण तीन वर्षांतच संपवले होते. पुढे ते पॉलिटेक्निकच्या द्वितीय वर्षाला असताना अति हुशारीपणामुळे एका शिक्षकामध्ये आणि टेस्लामध्ये मतभेद झाल्याने ते नापास झाले. जुगाराच्या लागेलल्या सवयीमुळे त्यांचे ग्रॅज्युएशन अपूर्ण राहिले. पुढे ते १८८१ मध्ये थॉमस अंडर कन्स्ट्रक्शन असलेल्या बुडापोस्ट मधील एका बुडापेस्ट टेलिफोन एक्सचेंज कंपनीत मुख्य विद्युत अभियंता म्हणून नोकरीला लागले. इथे काम करत असताना केंद्रीय संचार उपकरणांत नवीन शोध लावून उपकरणे सुधारित केले आणि नवीन स्वरूपातील टेलिफोन एम्प्लिफायर बनवले, पण त्याचे त्यांनी कधीच पेटंट घेतले नाही.

पुढे ते १८८२ मध्ये थॉमस अल्वा एडिसन ह्यांच्या फ्रान्समधील एडिसन कंपनीत विद्युत उपकरणे डिझाईन करणे आणि चांगले करण्याचे काम ते करू लागले. पुढे १८८४ साली तेथून त्यांची बदली न्यूयॉर्कमध्ये झाली. या दरम्यान त्यांनी काही वेगवेगळ्या प्रकारचे डायनमो विकसित केले. तेव्हा त्यांना एडिसन यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. एडिसन यांनी टेस्लाला त्यांचा DC जनरेटर जास्त प्रभावी करून देण्याचा प्रस्ताव ठेवला. व त्या बदल्यात ५०,००० डॉलर बक्षीस देण्याचे आश्वासन दिले; परंतु झालेल्या योग्य बदलानंतर एडिसन यांनी आपला शब्द न पाळल्याने टेस्ला यांनी ती कंपनी सोडली.

सन १८८६ मध्ये त्यांनी दोन इनवेस्टर्स सोबत आपली स्वतःची 'Tesla Electric Light And Manufacturing' नावाची कंपनी स्थापन केली. या कंपनीमध्ये त्यांनी डायनेमो इलेक्ट्रिक मशीन कम्युटेटर तयार केला. अमेरिकेतील लोकांना हे काही पटले नाही. त्यांनी टेस्लाला बाहेर काढले. पुढचे काही दिवस अगदी हलाखीचे गेले.

सन १८८७ च्या काळात परत नवीन इनवेस्टर्स सोबत कंपनी स्थापन केली. इथं ते मोटर व जनरेटरवर काम करू लागले. याच काळात AC वर चालणारी Induction Motor बनवली होती. याच काळात AC आणि एडिसन यांच्या DC Current आणि टेस्लाचा AC ह्यावर मोठं युद्ध सुरू झाले; परंतु एडिसन यांच्या वाईट प्रयत्नांना निष्फळता हाती लागली. यात पाहायला गेले, तर AC Current चे वैशिष्ट्य असे की, याचे वोल्टेज ट्रांसफॉर्मरद्वारा वाढवून खूप दूरपर्यंत पाठवता येऊ शकते. DC त मात्र हे करता येत नाही. AC मध्ये मात्र कमी वीज वापरतात. प्रत्येक घरात वीज ही केवळ AC प्रवाहानेच जाते, त्यामुळे विजय टेस्लाचा झाला. त्यावेळी DC System प्रचंड मोठ्या प्रमाणावर लागू होती. एडिसनची कंपनी DC उपकरणेच बनवत होती. याला विरोध म्हणून टेस्लाने AC प्रणालीचे महत्त्व जगाच्या समोर ठेवले.

या समवेत त्यांनी चक्रीय चुंबकीय क्षेत्राच्या सिद्धांताचा शोध लावला. त्याचे आविष्कार म्हणजे AC Electric Motor होय. यावर त्यांनी नायगरा धबधब्यावर पहिले जल विद्युत पॉवर स्टेशन उभारले. यानंतर केवळ अमेरिकेतच नाहीतर संपूर्ण जगानेच AC वर आधारित प्रणालीचा स्वीकार केला. यानंतर त्यांनी अमेरिकेत Wireless Power Transmission या तत्त्वावर वायरविरहित अंतरावर ठेवलेले बल्ब पेटवून त्याचे प्रात्यक्षिक दाखवले होते. याच काळात टेस्ला कॉईलचा शोध लागला. असे मानले जाते की, १८८४ मध्येच त्यांनी हंगेरीत Invisible Energy (क्ष-किरण) शोध लावला; परंतु याची साधने असलेली लॅब जाळून टाकण्याचा कट एडिसनचा होता, यानंतर त्यांनी Wireless Telegraphy

चा शोध लावला, सोबत कृत्रिम वीज तयार केली. याच दरम्यान रीसिव्हर टॉवर मधून काही अज्ञात सिग्नल मिळाले होते जे की त्यांच्या मते परग्रहावरून आले असावे. १९०६ ला ब्लेड नसलेले टर्बाईन बनवले. त्याचा वापर करून कोलोरॅडो धबधब्यावर पॉवर स्टेशन बसवले. १९१२ मध्ये ब्रेनला शॉक देऊन ब्रेन अधिक क्रियाशील करण्याच्या थेअरी मांडल्या. 'इलेक्ट्रिक रे' या प्रणालीचा उल्लेख त्यांनी करून ठेवला. 'Death Ray' या मशीनचा शोध लावला असा अनेकांचा दावा होता; परंतु टेस्लांनी रेडियो तरंगाचे ट्रान्समिशन करता येते, असे यात मांडले होते, या दरम्यान टेस्ला रॉडचा शोध लागला, 'रेडियो वेव कंट्रोलर' वापरून एका बोटीला चालवून दाखवले. पुढे याचे पेटंट 'मार्कोनी' यांना मिळाले.

अशा अनेक जगाला माहीत नसणाऱ्या गोष्टींचा व स्वतःच्या नावावर पेटंट नसणारा व ग्रेट 'लाईटनिंग मॅन' यांचा मृत्यू हे देखील एक गूढ रहस्य आहे. त्यांचे सारे संशोधन व उपकरणे अमेरिकेने ताब्यात घेऊन सर्वांपासून लपवून ठेवली. त्यांचा मृत्यू हा केवळ एक बनाव होता, ते अनेक वर्षं गुप्तपणे अमेरिकन सरकारसाठी काम करत राहिले, तसेच त्यांचे अनेक प्रयोग देखील लुप्त केले.

प्रसिद्धीला मुकलेल्या पण विज्ञान जगताला माहीत असलेल्या या महान शास्त्रज्ञाला माझा प्रणाम!



श्रीनिवास रामानुजन – भारतीय गणित तज्ञ

अनिता वायाळ (S.Y.B.Sc.)

श्रीनिवास रामानुजन अय्यंगर यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी तामिळनाडू प्रांतातील 'इरोड' या गावी झाला. त्यांचे नाव संत रामानुजा यांच्या नावावरून ठेवण्यात आले होते. त्यांचे वडील श्रीनिवास अय्यंगार एका कापडाच्या व्यापाऱ्याकडे नोकरी करत होते. त्या व्यवसायातील प्राप्ती अत्यंत तुटपुंजी असल्याने त्यांनी आपला मुक्काम कुंभकोणम या टुमदार शहरात हलवला आणि एका व्यापाऱ्याने मुनिमची नोकरी करण्यास सुरुवात केली.

वयाच्या पाचव्या वर्षी रामानुजन यांचे नाव कुंभकोणच्या प्राथमिक शाळेत दाखल करण्यात आले. गणितावर त्यांचे कल्पनातीत प्रभुत्व होते. ते मनातच गणित करून उत्तर शोधत. कधी कधी ते असे प्रश्न विचारत की, त्यांचे शिक्षकही कोड्यात पडत. तुम्हाला कधी प्रश्न पडला आहे काय? एखाद्या संख्येला शुन्याने भागल्यावर काय होईल. हा भागाकार संपत नाही. अनंत असतो. रामानुजन यांना लहानपणीच असे प्रश्न पडत.

माध्यामिक शाळेत देखील गणिताच्या सर्व परीक्षांत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला व अनेक पारितोषिकेही मिळवली. त्यांच्या या यशामुळे शिक्षक प्रभावित झाले. केवळ दोनच वर्षात त्यांनी प्राथमिक शालेय अभ्यासक्रम पूर्ण केला आणि वयाच्या दहाव्या वर्षी ते फायनलच्या परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. रामानुजन यांना वाचनाची प्रचंड आवड होती. त्यांची पाठांतर क्षमता आणि स्मरणशक्ती असामान्य होती. त्यांना संस्कृत सुभाषितमाला, पाढे आणि अनेक संख्यांचे वर्ग–घन–चतुर्थघात–वर्गमुळे–घनमुळे पाठ होती. शाळेत असताना रामानुजन यांनी एका कॉलेजच्या मित्रामार्फत कॉलेजच्या ग्रंथालयातील 'कार' नावाच्या जगप्रसिद्ध गणिततज्ञाचे 'सिनॉप्सिस ऑफ एलिमेंटरी रिझल्ट इन प्युअर ॲन्ड ॲप्लाइड मेथेमॅटिक्स' हे पुस्तक मिळवले. गणितज्ञ शुब्रीज कार यांच्या पुस्तकात सुमारे सव्वासहा हजार सिद्धांत आहेत. ते सर्व सिद्धांत श्रीनिवास रामानुजन यांनी कोणच्याही मार्गदर्शनाशिवाय केवळ स्व–अध्यायाने आत्मसात केले.

रामानुजन यांना असणारी गणिताबद्दलची ओढ पाहून त्यांचे वडील चिंतित झाले होते.त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी २२ व्या वर्षी त्यांचे लग्न लावून देण्यात आले. रामानुजन यांनी जबाबदारी वाढल्याने नोकरी शोधण्यास सुरुवात केली. मद्रास पोर्ट ट्रस्टचे फ्रान्सिस स्प्रिंग हे त्यांच्या तळपत्या गणिती बुद्धीने मुग्ध झाले आणि दरमहा २५ रु. वेतनावर कारकून म्हणून नेमले. त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत थोडीफार सुधारणा झाली.

रामानुजन यांनी इंग्लंडमधील केम्ब्रिज विद्यापीठातील सुप्रसिद्ध गणिताचे प्राध्यापक जी. एच. हार्डी यांना एका नऊ पानी पत्रात आपले काही गणिती शोध कळवले. ते वाचून प्राध्यापक हार्डी अचंबित झाले. त्यात अविभाज्य संख्या, अतिगुणोत्तरीय मालिका, मॉड्युलर फंक्शन, इव्हन मॅजिक स्क्वेअर्स, लंबगोलीय भूमिती, रेईमन सारणी, हायपरजॉमेट्रिक सारणी यांचा समावेश होता. त्यावरुन हार्डी व त्यांचे सहकारी लिटिलवूड यांना रामानुजन हे ज्येष्ठ गणिती असल्याशिवाय ते असे प्रश्न विचारू शकणार नाहीत हे कळून चुकले व त्यांनी रामानुजन यांना १९१४ मध्ये इंग्लंडला बोलवून घेतले.

तेथे त्यांच्या प्रतिभेला आणखीन पंख फुटले व त्यांनी मूलभूत असे काम करून अनेक सिद्धांत मांडले. रामानुजन जाहीरपणे सांगत असत की, आपल्याला गणितं चक्क स्वप्नात दिसतात. अनेक गणिती प्रमेये आपल्याला स्वप्नात दिसल्याचा त्यांचा दावा होता. केम्ब्रिज विद्यापीठात गणिताची ३ हजार प्रमेये उलगडणाऱ्या या महान भारतीय गणितज्ञाने एका स्वप्नाचे वर्णन तर असे केले की, ''मला एक लाल पडदा दिसला, जणू काही रक्ताचा पडदा मी विस्मित होऊन पाहात होतो तोच एक हात आला आणि त्यावर गणित सोडवू लागला. ती लिहिलेली गणिते मी जागा

झाल्यावर लिहून काढली.''इंग्लंडच्या कडाक्याच्या थंडीला रामानुजन यांचा शाकाहार रोखू शकत नव्हता ते क्षयाने ग्रासले. त्याकाळी त्यावर उपाय नव्हता. ते थकत, खंगत गेले, चर्या मलूल पडली. मरणोन्मुख असतानाही त्यांची गणिते चालूच होती. रामानुजन आजारी असताना प्रा. हार्डी हे इंग्लंडच्या 'पुतनी' रुग्णालयात भेटण्यास आले. टॅक्सीचा नंबर होता १७२९. हार्डीना ती संख्या डल, अशुभ वाटली. प्रा. हार्डी म्हणाले, ''मी १७२९. क्रमांकाच्या टॅक्सीने आलो. हा अंक अशुभ आहे. कारण त्यास तेरा या अशुभ अंकाने भाग जातो.'' रामानुजन पटकन म्हणाले, ''हा फार रंजक व महत्त्वपूर्ण आकडा आहे. दोन घनांच्या (क्यूब) बेरजेच्या स्वरूपात दोन प्रकारे मांडता येणारी ही सर्वांत लहान संख्या आहे.

१७२९= १००० (१० चा घन) + ७२९ (९ चा घन) आणि १७२९ = १७२८ (१२ चा घन) + १ (१ चा घन)


तेव्हापासून सारे जग १७२९ ला 'रामानुजन अंक' म्हणून ओळखू लागले. ते म्हणायचे, ''कोणत्याही संख्येकडे चिकित्सेने पाहिले की, त्या संख्येत चेतना निर्माण होते आणि ती बोलकी होते.''

क्षयाचे आजाराने ग्रासून २६ एप्रिल १९२० रोजी त्यांचे कुंभकोणम येथे अकाली निधन झाले. एक उज्वल तारा क्षितिजावर अचानकच निखळला. केवळ ३२ वर्षाचे आयुष्य लाभलेल्या अतिशय नम्र आणि निगर्वी वृत्तीच्या रामानुजन यांचे काम प्रामुख्याने अंकशास्त्र, थिटा फंक्शन आणि अनंत मालिका या क्षेत्रात आहे. त्यांनी मांडलेल्या जवळपास ४००० सूत्रांपैकी दोन तृतीयांश अगदी नवीन आहेत व काही तुरळक वगळता सगळी बरोबर आहेत.

केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी कॉलेजमध्ये गणितात असामान्य संशोधन करून अल्पावधीत जगभर प्रसिध्दी मिळवलेले थोर भारतीय गणितंज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आणि त्यांचे व ट्रिनिटी कॉलेजचे असलेले गहिरे संबंध अधोरेखित करण्यासाठी त्यांच्या नावाने फक्त भारतीय विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी केंब्रिजमध्ये गणितातील संशोधन शिष्यवृत्ती देण्यात येते. माजी प्रंतप्रधान डॉ. मनमाहेन सिंग यांनी २०१२ हे गणित वर्ष म्हणून घोषित केले. प्रसिद्ध गणितज्ज्ञ रामानुजन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांना श्रद्धांजली वाहताना पंतप्रधानांनी ही घोषणा केली होती.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

रोहित अशोक पाटील (S.Y.B.Sc.)




एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तमिळनाडूच्या रामेश्वरम् येथील तीर्थक्षेत्रातील गरीब तमिळ मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांची आई असिमा ही एक गृहिणी होती आणि त्यांचे वडील जैनुबुलादीन हे स्थानिक मशिदीचे इमाम होते. जरी कुटुंब आर्थिकदृष्ट्या श्रीमंत नसले, तरीही सर्व मुलांनी प्रेम आणि करुणामय वातावरणात उभे केले होते. कौटुंबिक उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी कलाम यांना त्यांच्या सुरुवातीच्या काळातील वर्तमानपत्रे विकावी लागली.

ते शाळेत एक सरासरी विद्यार्थी होते; परंतु त्यांना शिकण्याची तीव्र इच्छा होती आणि खूप मेहनती होते. त्यांना गणित आवडत असे व विषयाचा अभ्यास करण्यासाठी १९५४ मध्ये त्यांनी उच्च माध्यमिक विद्यालय येथून शिक्षण घेतले. नंतर त्यांनी सेंट जोसेफ कॉलेज तिरुचिरापल्ली येथून पदवी प्राप्त केली. त्यांना एक लष्करी पायलट बनायचे होते; परंतु त्यांचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. कारण तेथे आठ जागा उपलब्ध होत्या. आएएफ मध्ये त्यांना नववे स्थान प्राप्त झाले होते.

१९६० मध्ये त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी येथून पदवी घेतली आणि डिफेन्स रिसर्च ॲंड डेव्हलपमेंट सर्व्हिसचे सदस्य बनल्यानंतर एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट येथे वैज्ञानिक म्हणून काम केले. प्रसिद्ध स्पेस वैज्ञानिक विक्रम साराभाई जेव्हा इनरकोअर समितीचे एक भाग होते तेव्हा कलाम यांना १९६९ मध्ये इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन येथे हस्तांतरित करण्यात आले ते देशातील अग्रगण्य उपग्रह प्रक्षेपण वाहन (एस एल व्ही) चे प्रकल्प प्रमुख बनले. जुलै १९८० मध्ये कलामांच्या नेतृत्वाखाली एस एल व्ही ३ ने रोहिणी उपग्रह यशस्वीपणे पृथ्वीच्या कक्षात तैनात केला.

कलाम १९७० मध्ये प्रोजेक्ट डेव्हिलसमवेत अनेक प्रकल्पांचा एक भाग होते. जरी प्रकल्प यशस्वी झाला नाही तरी १९८० मध्ये त्यांनी पृथ्वी मिसाईल च्या विकासासाठी पाया घातला. १९८३ मध्ये कलाम डी आर डीओचे मुख्य अध्यक्ष म्हणून परत आले आणि त्यांना इंटिग्रेटेड गाईडेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम करण्यास सांगितले होते.



मे १९९८ मध्ये भारताने पोखरण –२ अण्विक चाचणी पार पाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली या परमाणू चाचणीच्या यशस्वितेमुळे कलाम एक राष्ट्रीय नायक बनले आणि ते लोकप्रिय झाले. २००२ मध्ये कलाम यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीने राष्ट्रपती पदाच्या उमेदवारीसाठी निवड केली आणि ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. २५ जुलै २००२ रोजी ते भारताचे ११ वे राष्ट्रपती बनले. राष्ट्रपती पदाच्या पदापूर्वी भारतरत्न प्राप्त झाल्यानंतर ते भारताचे तिसरे राष्ट्रपतीही बनले. सामान्य लोकांसह विशेषत: तरुणांबरोबर काम करण्याच्या आणि त्यांच्याशी संवाद साधण्याच्या त्यांच्या शैलीमुळे त्यांना प्रेमाने 'द पीपल्स प्रेसिडेंट' असे म्हणतात. अध्यक्ष म्हणून आपल्या कार्यकाळात त्यांनी सादर


केलेल्या दया याचिकेचे निदान ठरविण्यामध्ये त्यांच्या निष्क्रियतेबद्दल टीका केली गेली. २१ दया याचिकेतून त्यांनी केवळ एका दया याचिकेवर कार्य केले. २००५ मध्ये त्यांनी बिहारमध्ये राष्ट्रपती राज्यासाठी शिफारस केली, जे एक विवादास्पद निर्णय देखील बनले.

अध्यक्षपद संपल्यानंतर ते इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आय आय एम्) अहमदाबाद, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (इंदौर) येथे भेट देणारे प्राध्यापक बनले. त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आय आय एस सी) बेंगलूर आणि एक सहकारी मानद इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अॅड टेक्नोलॉजी तिरूवनंतपुरम येथे चान्सलर म्हणून अण्णा विद्यापीठात आणि बनारस हिंदू युनिव्हर्सिटी मध्ये तंत्रज्ञान शिकवले आणि आय आय टी हैदराबाद येथे माहिती तंत्रज्ञान शिकवले.

भ्रष्टाचार पराभूत करण्यासाठी आणि कार्यक्षमतेत वाढ आणण्यासाठी कलाम यांनी २०१२ मध्ये **रिमूव्ह 'आय'–'मी' मूव्हमेंट** नामक युवकांसाठी कार्यक्रमसुद्धा सुरू केला. कलाम यांना भारत सरकारकडून प्रतिष्ठित भारतरत्न पद्मविभूषण आणि पद्मभूषण देऊन सन्मानित करण्यात आले. १९९७ मध्ये त्यांना भारत सरकारद्वारे राष्ट्रीय एकत्रीकरणासाठी इंदिरा गांधी पुरस्कार देण्यात आले. वीर सावरकर पुरस्कार मिळवणारे ते पहिले ठरले. तसेच २००० मध्ये त्यांना अलावास रिसर्च सेंटर कडून रामानुजन पुरस्कार देण्यात आला. २००७ मध्ये त्यांना रॉयल सोसायटीकडून किंग चार्ल्स दुसरे पदक मिळाले. त्यांनी ४० विद्यापीठांतून मानद डॉक्टरेट प्राप्त केली.जागतिक विद्यार्थी दिवस म्हणून संयुक्त राष्ट्रानी कलामांचा वाढदिवस ओळखला. २००३ आणि २००६ मध्ये त्यांना 'एम. टी. व्ही' युवक आयकॉन ऑफ द इयर म्हणून नामांकन मिळाले.

कलाम आय. आय. एम. शिलाँगला २७ जुलै २०१३ रोजी 'लिव्हेबल प्लॅनेट' वर भाषण देण्यासाठी गेले, पायऱ्या चढून गेल्यानंतर त्यांनी काही अस्वस्थता व्यक्त केली; परंतु त्यांनी ऑडिटोरियममध्ये प्रवेश केला. लेक्चरमध्ये पाच मिनिटे झाल्यावर ते अत्यवस्थ झाले. त्यांना बंथानी हॉस्पिटल केंद्रात नेले व सकाळी ९.४९ वाजता हृदयविकाराच्या कारणामुळे त्यांचा मृत्यू घोषित करण्यात आला.

किशोरांना व युवकांना समर्थ भारत घडविण्याची प्रेरणा देणारे डॉ. कलाम अजूनही त्यांच्या विचारांच्या रूपाने आपल्यातच आहेत.



अल्बर्ट आईन्स्टाईन

सुभाष दत्तात्रय पवार (S.Y.B.Sc.)

(जन्म – मार्च १४, इ.स. १८७९, मृत्यु – एप्रिल १८, १९५५)

अल्बर्ट आईन्स्टाईन यांचा जन्म जर्मनी देशातील वुर्टेंबर्गमधील उल्म या गावामध्ये झाला. उल्म स्टुटगार्टपासून सुमारे १०० किलोमीटर अंतरावर आहे. त्यांचे वडील हर्मन आईन्स्टाईन हे आधी एक विक्रेता होते आणि त्यांनी नंतर विद्युत–रासायनिक पदार्थांशी निगडित कारखाना काढला. अल्बर्टच्या आईचे नाव पॉलिन होते आणि त्या गृहिणी होत्या. हे एक ज्यू कुटुंब होते. अल्बर्ट तेथील एका कॅथॉलिक प्राथमिक शाळेत शिकले आणि त्यांच्या आईच्या आग्रहामुळे त्यांनी व्हायोलिन या तंतुवाद्याचे काही धडे घेतले. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा ल्युत्पोल्ड व्यायामशाळेत (सध्या आईन्स्टाईन व्यायामशाळा) प्रवेश झाला. येथे त्यांनी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण घेतले. त्यापुढील सात वर्षांनंतर त्यांनी जर्मनी सोडली. ते डावखोरे होते असे म्हणतात, पण याचा आजतागायत पुरावा सापडलेला नाही.

एकदा आईन्स्टाईन यांना त्यांच्या वडिलांनी एक होकायंत्र दिले; आईन्स्टाईन यांना जाणवले की, 'रिक्त अवकाश' आणि होकायंत्रातील बाणाची हालचाल यामागे नक्कीच काहीतरी रहस्य आहे. ते जसजसे मोठे होत गेले तसतसे आईन्स्टाईन यांनी मजेसाठी अनेक रचनाकृती आणि यांत्रिक उपकरणे बनवली व आपले गणितातले कसब दाखविले. जेव्हा आईन्स्टाईन दहा वर्षांचे होते, तेव्हा त्यांच्या भावाने मॅक्स टॅलमड (नंतर मॅक्स टॅल्मी) या पोलंडमधील अतिशय गरीब ज्यू वैद्यकीय विद्यार्थ्याची ओळख त्यांच्या कुटुंबाशी करून दिली. पाच वर्षांच्या सहवासात मॅक्स टॅलमड हा दर आठवडा लहानग्या अल्बर्टला अनेक विज्ञानविषयक पुस्तके, गणिती कोडी आणि तत्त्वज्ञानविषयक लिखाणे देत असे. या पुस्तकात इमॅन्युएल कॅन्ट्स यांचे सुयोग्य तर्कसंगतीचे समालोचन हे पुस्तक तसेच युक्लिडचे घटक या पुस्तकांचा समावेश होता. (आईन्स्टाईन त्या पुस्तकाला एक पवित्र भूमिती पुस्तक असे म्हणत.) अल्बर्टच्या कल्पनाशक्तीची वाढ ही त्याच्या घरातून सुरू झाली. त्याची आई एक उत्कृष्ट पियानोवादक होती. ही कला त्यांनी अल्बर्टला शिकवली. त्यांचे मामा जेकब यांनी अॅल्बर्टशी गणिते सोडवून दाखवण्याची पैज लावली होती. ही गणिते अॅल्बर्टने अतिशय आनंदाने सोडवली. मॅक्स टॅलमडच्या इ.स. १८८९ ते इ.स. १८९४ या कालखंडात दर आठवड्यात होणाऱ्या त्यांच्या भेटीत टॅलमड यांनी अनेक धार्मिक संकल्पना मांडून 'बायबलमधील अनेक गोष्टी असत्य असू शकतात या विचाराकडे अॅल्बर्टचे लक्ष वेधले. अॅल्बर्टचे स्वयंअध्ययन इतके प्रभावी होते की, ते त्यांच्या अभ्यासक्रमात असलेली भूमितीची अवघड गणिते चुटकीसरशी सोडवत असत.

अॅल्बर्ट यांना शाळेत मंदगतीने शिकणारा समजण्यात येत असे. कदाचित यामागील कारण आरोग्यविषयक बाबींशी निगडित असावे; परंतु सापेक्षतावादाच्या सिद्धांताचे काही श्रेय त्यांनी त्यांच्या धीम्या


गतीने शिकण्याला दिले. कारण, इतरांच्या तुलनेत काळ आणि अवकाश हे उशिराने शिकल्यामुळे ते एकप्रकारे प्रगत पद्धतीने विचार करू शकले.

ॲल्बर्टच्या मंदगतीने शिकण्याला एक दंतकथा जोडली गेली. ॲल्बर्ट हे गणित विषयात कच्चे होते आणि त्या विषयात वारंवार नापास झाल्याने त्यांच्या शिक्षकाने त्यांना त्या कारणास्तव शाळेबाहेर काढले. पुढे जेव्हा साक्षेपतावादाच्या सिद्धांतानंतर त्या शिक्षकांनी त्यांची प्रामाणिक मत व्यक्त केले की, ॲल्बर्टसारखा मुलगा असा शोध लावेल हे तेव्हा स्वप्नातही वाटले नाही आणि आताही ते खरे वाटत नाही; परंतु त्यामागील खरे कारण असे आहे की, त्या वर्षी श्रेणीबदलाच्या नव्या नियमांमुळे थोडा गोंधळ उडाला होता. त्यामुळे या दंतकथेचा जन्म झाला असावा.

सापेक्षतावादाचा सिद्धांत, प्रकाशीय विद्युत परिणाम, पुंजभौतिकी, विश्वशास्त्र, विश्वरचनाशास्त्र वगैरे क्षेत्रांमध्ये त्यांचे विशेष योगदान आहे. त्यापैकी प्रकाशीय विद्यूत परिणाम या सिद्धांतासाठी आणि त्यांच्या सैद्धांतिक भौतिकशास्त्राच्या सेवेसाठी इ.स. १९२१ साली त्यांना नोबेल पुरस्कार देऊन 'सन्मानित' केले गेले. आईन्स्टाईन यांना त्यांच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतानंतर जगभर प्रसिद्धी मिळाली आणि ते जगातील प्रसिद्ध वैज्ञानिक म्हणून आईन्स्टाईन यांनी 'अल्बर्ट आईन्स्टाईन'ची व्यापारचिन्हं म्हणून नोंदणी केली. एका शास्त्रज्ञाला त्याची इतकी प्रसिद्धी असणे आणि त्यामुळे होणारे परिणाम याचा अनुभव नव्हता. आज बुद्धिमत्ता आणि आईन्स्टाईन हे एक प्रकारे समीकरणच बनले आहे. त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभी आईन्स्टाईन याने विचार केला की, विद्युत चुंबकीय नियमांसोबत पारंपरिक यांत्रिकीच्या नियमांशी मेळ बसत नव्हता. या घटनेने त्यांच्या विशिष्ट सापेक्षता सिद्धांताला चालना मिळाली. तथापि त्यांना असे वाटू लागले की, सापेक्षतेचे तत्त्व हे गुरुत्वाकर्षणाचेच सापेक्षतेचे तत्त्व हे गुरुत्वाकर्षणाचेच सुधारित आणि विस्तारित रूप आहे. त्यांनी १९१६ साली त्यांच्या अनुबर्ती गुरुत्वाकर्षण सिद्धांतानुसार सामान्य सापेक्षता सिद्धांतावर एक शोधनिबंध प्रकाशित केला. सांख्यिकीय यांत्रिकी आणि पुंजयांत्रिकी सिद्धांत यांच्या समस्यांची उकल करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांना त्यांच्या आण्विक सिद्धांत आणि रेण्विक गती या संबंधित सिद्धांत स्पष्ट करता आले. त्याचप्रमाणे त्यांनी प्रकाशाच्या औष्णिक गुणधर्माचा शोध लावल्यामुळे त्यांना प्रकाशकणांचा सिद्धांत मांडता आला. १९१७ साली, आईन्स्टाईन यांनी त्यांचा सामान्य सापेक्षता सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी एका भव्य विश्वाची रचनाकृती प्रदर्शित केली.

आईन्स्टाईन यांनी १९३३ साली अमेरिकेला भेट दिली होती तेव्हा जर्मनीत ॲडॉल्फ हिटलर सत्तेवर आला आणि त्यामुळे आईन्स्टाईन यांनी ते पूर्वी जिथे प्राध्यापक होते त्या प्रशियन विज्ञान महाविद्यालय बर्लिन विज्ञान अकादमी येथे परत जाण्यास नकार दिला आणि ते अमेरिकेत स्थायिक झाले. १९४० मध्ये त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वसंध्येला, आईन्स्टाईन यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट यांना एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी आवाहन केले होते की, रुझवेल्ट यांनी तत्काळ आदेश देऊन अत्यंत आधुनिक व महाभयंकर अणुबॉम्ब यांची निर्मिती थांबवावी; परंतु त्या पत्राची दखल न घेता अमेरिकेने मॅनहॅटन प्रकल्प उभारला. आईन्स्टाईन यांचा सैन्याच्या संरक्षण धोरणाला पाठिंबा होता; परंतु त्यांनी मोठ्या प्रमाणावर वापरत असलेल्या अणुकेंद्राचे विभाजन या तत्त्वावर चालणाऱ्या शस्त्रांचा निषेध केला. काही काळानंतर आईन्स्टाईन यांनी ब्रिटिश तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल यांच्याशी संपर्क साधून रसेल आईन्स्टाईन जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली. या जाहीरनाम्यात आण्विक शस्त्रांचे दुष्परिणाम विशद करण्यात आले होते. आईन्स्टाईन हे अमेरिकेतील प्रिन्स्टन, न्यू जर्सी या शहरातील इन्स्टिट्यूट फॉर ॲडव्हान्सड स्टडी या शिक्षण संस्थेशी शेवटपर्यंत संलग्न राहिले. इ.स. १९५५ साली आईन्स्टाईन यांचे निधन झाले.

आईन्स्टाईन यांनी सबंध आयुष्यात एकूण ३०० वैज्ञानिक शोधनिबंध आणि १५० गैरवैज्ञानिक निबंध प्रकाशित केले आहेत. त्यांच्या अनेक महान बौद्धिक कामगिरी आणि त्यांची विलक्षण कल्पनाशक्ती यामुळे अलौकिक बुद्धिमत्ता या अर्थाने आईन्स्टाईन हा शब्द वापरला जाऊ लागला.



असीमा चॅटर्जी

आरती रंगनाथ आंबेकर (S.Y.B.Sc.)

असीमा चॅटर्जी यांना 'पहिल्या भारतीय रसायनशास्त्रज्ञ' असे संबोधले जाते. त्यांचे रसायनशास्त्रातील कार्य उल्लेखनीय असेच आहे.

असीमा चॅटर्जी यांचा जन्म बंगालमधील कोलकाता येथे २३ सप्टेंबर १९१७ साली झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कोलकात्यातच झाले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी कोलकाता विद्यापीठात प्रवेश घेतला व रौप्यपदकासह सेंद्रीय रसायनशास्त्रातील एम.एस्सी. झाल्या. ही पदवी मिळवणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या. पुढे कोलकाता विद्यापीठात अधिव्याख्याता म्हणून काम करत असतानाच १९४७ साली त्या संशोधनासाठी अमेरिकेला रवाना झाल्या. तिथूनच त्या युरोपला गेल्या व झुरिक विद्यापीठातील १९३७ सालचे नोबेल पारितोषिक विजेते पॉल करीट यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संश्लेषणात्मक सेंद्रीय रसायनशास्त्र या विषयात संशोधन केले. १९५० साली त्या भारतात परतल्या व भारतीय औषधी वनस्पतींवर त्यांनी विपुल संशोधन केले. वनस्पतींपासून मिळणाऱ्या अल्काईडस् व कौमारीन्स या रासायनिक पदार्थांच्या संशोधनावर त्यांचा विशेष भर होता. त्यांनी नॅचरल प्रॉडक्टवरही

संशोधन केले. भारतातील औषधी द्रव्ये वनस्पतींपासून मिळवणे व त्यांचा रासायनिकदृष्ट्या अभ्यास करणे, त्यांची रचना शोधून काढणे, त्यांची प्रयोगशाळेत निर्मिती करणे या कामात त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. त्यांनी अज्मॅलीसिन व सर्पाजीन या रसायनांवर संशोधन करून त्यांची रचना स्पष्ट केली.


चॅटर्जी यांनी मिरगी (फिट्स) विरुद्ध 'आयुष-५६' चे औषध 'मर्सिलिया मिन्युटा' या वनस्पतीपासून वेगळे केले. चार वनस्पतींपासून हिवतापविरोधी औषधही मिळवले. या औषधांचे पेटंटही त्यांनी मिळवले. सुपारी, तंबाखू, कॉफी इ. मध्ये आढळणारी 'अल्कालॉईड्स' सुगंधी द्रव्यामध्ये, तसेच स्वादासाठी वापरली जाणारी रसायने (कौमारीन्स) व वनस्पतींमधून मिळणाऱ्या तैलवर्गीय पदार्थांमध्ये आढळणारी 'टर्पिनॉईड्स' यावर त्यांनी विपुल संशोधन केले व सेंद्रीय रसायनशास्त्र व औषधी रसायनशास्त्र यांत मोलाची भर घातली. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधून साडेतीनशेहून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध झाले. चॅटर्जी यांनी 'भारतीय वनौषधी' या ग्रंथांच्या सहा खंडांचे १९७३-१९७७ या काळात संपादन केले. १९७५ साली त्यांनी भारतीय विज्ञान काँग्रेसचे अध्यक्षपदही भूषवले. असे पद भूषवणाऱ्या त्या पहिल्या महिला शास्त्रज्ञ होत्या.

आयुष्यातील प्रत्येक क्षण संशोधन व अध्यापनात घालवलेल्या चॅटर्जी यांना अनेक पदव्या व सन्मान प्राप्त झाले. नागार्जून पारितोषिक व सुवर्णपदक (१९४०), भारताचे नोबेल समजले जाणारे शांतिस्वरूप भटनागर पारितोषिक (१९६१), सर पी.सी. रे पारितोषिक (१९७४), हरी ओम ट्रस्टचे सर सी.व्ही. रामन पारितोषिक (१९८२), भारतीय विज्ञान काँग्रेसचे सर आशुतोष मुखर्जी स्मरणार्थ सुवर्णपदक, बेंगाल चेंबर्स ऑफ कॉंग्रेसने 'वूमन ऑफ द ईयर' म्हणून १९७५ साली त्यांचा गौरव केला. १९७५ सालचा 'पद्मभूषण' हा किताब देऊन भारत सरकारने त्यांचा गौरव केला.

'श्रम हीच पूजा' असे मानणाऱ्या या विज्ञान विदुषीने २३ नोव्हेंबर २००६ साली या जगाचा कायमचा निरोप घेतला.

डॉ. जयंत विष्णू नारळीकर

वैष्णवी बजरंग वाघोले (S.Y.B.Sc.)



जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचे वडील बनारस हिंदू युनिव्हर्सिटी येथे गणित विषयाचे प्राध्यापक आणि गणित विभागाचे प्रमुख होते. त्यांची आई संस्कृत या विषयाची अभ्यासक होती. जयंत नारळीकर यांचे शालेय शिक्षण बनारस (वाराणशी) येथेच झाले. तेथूनच १९५७ मध्ये ते बी.एस्सी. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

यानंतर गणिताच्या उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला रवाना झाले. तेथे त्यांनी फिट्झ विल्यम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. १९६० मध्ये त्यांनी केंब्रिज विद्यापीठाची गणितातील पदवी संपादन केली. १९६३ मध्ये फ्रेड हॉइल यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएच.डी. मिळविली. पुढे नारळीकरांनी एम.ए. आणि डॉक्टर ऑफ सायन्स या पदव्याही त्यानी संपादन केल्या. केंब्रिज येथे ते १९७२ पर्यंत होते. या काळात त्यांनी अनेक पारितोषिकेही पटकावली. इन्स्टिट्यूट ऑफ थिऑरिटिकल ॲस्ट्रॉनॉमी या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा मोठा सहभाग होता. तेथेच त्यांनी सर फ्रेड हॉइल यांच्यासह खगोलशास्त्रात संशोधन केले.

१९७२ मध्ये डॉ. जयंत विष्णू नारळीकर भारतात परत आले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च येथे त्यांनी आपले संशोधन कार्य चालू केले. त्यामुळे त्यांचे नाव जगभर झाले. भारतातील युनिव्हर्सिटी ग्रॅंट्स कमिशनकडून त्यांना आमंत्रण आले. १९८८ मध्ये त्यांनी आयुकाची स्थापना केली. सन २००३ पर्यंत त्यांनी आयुकाचे संस्थापक संचालकपद भूषविले. खगोलशास्त्रातील शिक्षणाचे आणि संशोधनाचे एक उत्कृष्ट केंद्र म्हणून आयुकाची जगभर ख्याती झाली. आयुकात आजतागायत ते प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

विश्वाची निर्मिती एका प्रचंड स्फोटातून झाली असावी, असे काही खगोलशास्त्रज्ञांना वाटते; तर काही शास्त्रज्ञ विश्व हे स्थिर स्थितीत आहे. म्हणजेच ते अनादी आहे, असे मानतात. डॉ. जयंत विष्णू नारळीकरांनी विश्वाचे स्थिर स्थितीचे समर्थन केले. पृथ्वीपासून ४१ कि.मी. उंचावरील हवेचे नमुने तपासून त्यातील सूक्ष्म जीवांचा अभ्यास करण्यासाठी बनविलेल्या आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांच्या एका गटाचे नेतृत्व त्यांनी केले. अवकाशातून पृथ्वीवर सूक्ष्म जीवांचा मारा होऊन त्यातीलच काही जीव पृथ्वीवर स्थिरावले आणि त्यातूनच जीवनिर्मिती झाली असावी, अशी शक्यता त्यांनी वर्तविली. गुरुत्वाकर्षणाशी संबंधित असलेला हॉइल-नारळीकर सिद्धांत जगप्रसिद्ध आहे.

डॉ. जयंत विष्णू नारळीकरांनी अनेक मासिक व वृत्तपत्रांमध्ये मराठी, हिंदी व इंग्रजी यांसारख्या भाषांमधून अतिशय उद्‌बोधक असे लिखाण केले आहे. क्लिष्ट विषय अतिशय सोप्या भाषेत मांडण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले, अनेक नामांकित संस्थांची महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली; परंतु विनम्रतेची कास त्यांनी कधीच सोडली नाही. भारत सरकारने डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचा पद्मभूषण व पद्मविभूषण हे सन्मान देऊन त्यांचा गौरव केला.

आपल्या भारत देशाचे नाव उज्ज्वल करणारे डॉ. जयंत विष्णू नारळीकरांसारख्या शास्त्रज्ञांचा आपण अभिमान बाळगला पाहिजे.



स्वातंत्र्यसैनिक ते शेतीतज्ज्ञ बद्रीनारायण आर. बारवाले

भरत भाऊसाहेब डाके (S.Y.B.Sc.)



या ओठांनी चुंबुन घेई हजारदा ही माती
अनंत मरणे झेलून घ्यावी इथल्या जगण्यासाठी ।
इथल्या पिंपळ पाण्यावरती अवघे विश्व तरावे
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे ।।

पद्मभूषण डॉ. बद्रीनारायणजी रामुलाल बारवाले यांचा जन्म गणेश चतुर्थी या पवित्र दिनी हिंगोली येथे झाला. 'कात्रलिवाल' या कुटुंबात जन्मलेले बद्रीनारायण यांचे घरचे अठरा विश्वे दारिद्र्य होते. त्यांच्या वडिलांचे निधन त्यांच्या जन्मापूर्वीच झाले. नियतीने त्यांच्या समोर जन्माअगोदरच कष्टाचे ताट वाढून ठेवलेले होते आणि या संकटांवर मात करण्यास ते बालपणीच शिकले. उद्योजगतेचे धडे घेण्याची गरज त्यांना कधीच भासली नाही. १२ वर्षांचे असतानाच बद्रीनारायण बारवाले कुटुंबाचे कर्ते पुत्र झाले.

जालना येथील मिशन शाळेमध्ये त्यांचे शिक्षण झाले. मराठवाड्यामध्ये हैदराबादच्या निजामाविषयी राग निर्माण झाला आणि बद्रीनारायण यांनी 'मराठवाडा मुक्तिसंग्राम' या चळवळीत हिरीरिने भाग घेतला. वर्गमित्रांची विद्यार्थी संघटना त्यांनी बांधली. यामुळे त्यांना शाळेतून काढून टाकण्याची धमकी मुख्याध्यापकांनी त्यांना दिली; परंतु तो वाद नंतर शमला.

इ.स. १९४६ शालेय शिक्षण पूर्ण करून बद्रीनारायण हैदराबाद येथील निजाम कॉलेज येथे प्रविष्ट झाले. तेथे शिक्षण सोडून स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यासाठी बद्रीनारायणांनी जालन्याला मुक्काम हलवला. निजाम पोलीस रजाकार बद्रीनारायणांना शोधू लागली. नंतर त्यांना औरंगाबाद येथील हरसूल जेलमध्ये कैदेत ठेवण्यात आले. सुमारे एक वर्षानंतर राष्ट्रीय काँग्रेसच्या मदतीने बद्रीनारायणांची सुटका झाली. हैदराबाद संस्थानाच्या हद्दीबाहेरील देऊळगाव राजा येथे त्यांनी बंदुकीचे शिक्षण मिळवले. अनेक हुतात्म्यांच्या त्यागाने १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा मुक्त झाला.

लहानपणापासून शेतीची आवड असलेल्या बद्रीनारायणांनी आपला मोर्चा शेतीकडे वळवला. मांडवा ता. बदनापूर जि. जालना शिवारात असलेल्या वडिलोपार्जित शेतीकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले. शेतीमध्ये त्यांनी नवनवीन उपक्रम सुरू केले. 'पुसासावनी' या भेंडीचा पहिला प्रयोग झाला. मांडव्यातील प्रत्येक शेतकऱ्याला बारवाले यांनी शेतीच्या क्रांतीचा मूलमंत्र दिला आणि त्यांना आपल्यासोबत घेतले. गावासाठी बद्रीनारायणांनी अनेक शेतकऱ्यांना शालेय विद्यार्थी यांच्यासाठी १९६५ साली जि.प. शाळेसाठी बारवालेंनी मोलाची कामगिरी बजावली.

१९६७ साली 'सीड रिव्हीव्ह टिमच्या' माध्यमातून अमेरिका हॉलेंड, स्वीडन, इंग्लंड, जपान या प्रगत देशांचा बद्रीनारायणांनी दौरा केला. या

बद्रीनारायण रामुलाल बारवाले
अल्प परिचय

जन्म – १९३१ मृत्यू – २०१७

१९५० – ओक्रा संकरित वाणाची निर्मिती

१९६४ – महिकोची स्थापना

१९६७ – पद्मश्री

१९९८ – वर्ल्ड फुड प्राईज (१२ वे)

२००१ – पद्मविभूषण

२००२ – साली Monsanto या जागतिक कंपनीने महिकोच्या मदतीने बीटी–कॉटन या प्रजातीचा भारतात उपक्रम चालू केला. बोलगार्ड–१, बोलगार्ड ई २ यामध्ये महिकोचे योगदान.

२०१५ – पर्यंत महिकोचे कामकाज व्हिएतनाम, बांग्लादेश, फिलीपाईन्स आणि आफ्रिका देशांमध्ये चालते.

* महिकोकडे Bt-cotton चे licence आहे.
* २१ वेगवेगळ्या प्रजाती आहेत ज्यांचा अभ्यास महिको करते.
* १५० हून अधिक शास्त्रज्ञ महिकोमध्ये कार्यरत आहेत.
* सुमारे २० देशांमध्ये ही कंपनी चालते. आफ्रिकेमध्ये सगळ्यात मोठी बीज कंपनी महिको आहे.
* भारतातील पहिले संकरित गव्हाचे वाण 'प्रथम ७०७०' महिकोने केले.
* महिको आणि पुरस्कार

२०१३ – The Association of Biotechnology तर्फे कृषी क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार.

१९९० – International Science & Seed Technology (ISST) आणि Federation of Indian Chamber and Industries (FICCI) कडून सन्मानित.

* Bt brinjal, Monsanto यांच्या मदतीने भारतात आणले; परंतु त्याचा बेत फसला. परंतु नक्कीच भविष्यात Bt. brinjal हा वाण महिको भारताला देईल अशी अपेक्षा करणे वावगे ठरणार नाही.
* संकरित बाजरी, ज्वारी, मक्का, कापूस इत्यादी उत्पादने महिकोने भारताला दिलेले मोलाचे योगदान आहे.

GO TO INDEX

देशांतील शेती, तंत्रज्ञान व बियाणांचा बारवालेंनी अत्यंत जवळून अभ्यास केला. बियाणे उद्योजक, शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्याशी संवाद साधला.

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतरावजी नाईक, भारताचे पंतप्रधान स्व. लालबहाद्दूर शास्त्री यांनी बद्रीनारायण बारवाले यांच्या शेती, बियाणे यांची दखल घेतली. स्वतंत्र भारताच्या या हरितक्रांतीच्या क्रांतिकारकांचा त्यांनी सन्मान केला. आज आपला भारत अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेकडे जाण्याच्या मार्गात बारवाले यांचा मोलाचा वाटा आहे. व्यापार आणि शेतीमध्ये चांगले काम याबद्दल भारत सरकारकडून दिला जाणारा पद्मभूषण हा सन्मान देऊन २००१ साली त्यांना सन्मानित करण्यात आले. तामिळनाडू विद्यापीठाकडून 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही मानाची पदवी त्यांना बहाल करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने 'डी.लिट' ही मानाची पदवी २०१० ला बहाल केली.

उद्योजकांसोबतच बारवाले यांनी मनापासून समाजसेवादेखील केली. शिक्षण क्षेत्रामध्ये जालना एज्युकेशन सोसायटीच्या जेईएस महाविद्यालयाच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले. सरस्वती भुवन शिक्षण संस्था औरंगाबाद, रांजणी या धनसावंगी तालुक्यातील छोट्याशा गावात मराठवाड्यातील पहिली इमारत बारवाले यांनीच बांधली. ग्रामीण भागातील शिक्षणाचा हा आदर्श मापदंड आहे. या शिक्षणकार्याचा आढावा घेताना लातूर येथील प्रसिद्ध 'शाहू कॉलेजच्या' धर्तीवर बद्रीनारायणांनी जालना येथे बद्रीनायाराण बारवाले महाविद्यालयाची स्थापना केली. कला, विज्ञान आणि अत्याधुनिक जैवतंत्रज्ञानाचे हे अत्याधुनिक केंद्र बनले आहे. त्याचबरोबर इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये गोल्डन ज्युबिली हायस्कूल जालना येथील सर्व शिक्षणाचे मापदंड असलेला दिसून येतो.

३१ डिसेंबर १९९२ जालना येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे डोळ्याचे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल 'श्री गणपती नेत्रालय' या दृष्टी तिर्थाचे शुभारंभ बारवाले यांनी केला. मद्रास येथील शंकर नेत्रालयाचा आदर्श घेऊन गणपती नेत्रालयाचे बीज त्यांनी रोवले. ७.५ एकरामध्ये १ लाख ८० हजार वर्गफुटाची इमारत बांधली. मुंबईचे सुप्रसिद्ध 'बॉम्बे हॉस्पिटल' औरंगाबादचे 'डॉ. हेडगेवार हॉस्पिटल' बारवालेंच्या सहकार्याची साक्ष आहेत.

बायोटेक्नॉलॉजी या विषयातील जागतिक पातळीवरील संशोधनाचे कार्य बारवाले नॉलेज आणि स्टडी सेंटर जालना येथे चालते. जालन्यातील बायोटेक्नॉलॉजीतील पार्क हा बारवाले यांच्या प्रयत्नातून साकार झालेला प्रकल्प आहे. दावलवाडी येथे महिलांचे कृषी संशोधन केंद्र जागतिक दर्जा आणि मान्यताप्राप्त ''महिको रिसर्च आणि लाईफ सायन्सेस सेंटर'' दावलवाडी, भारतातील १२५ कोटी जनतेस पुरेल एवढे बियाणे निर्मिती करणेचे दावलवाडीच्या या कृषी संशोधन केंद्रात चालू आहे. शिक्षण, आरोग्य आणि शेतीसंशोधन क्षेत्रात काम केलेल्या या महात्म्याचे २४ जुलै २०१७ रोजी मुंबई येथे उपचारादरम्यान निधन झाले.



पंढरीची वारी

विठूरायाची पंढरी, पंढरीची वारी
भक्तांची मांदियाळी,हरिनामाची शिदोरी

पावसाच्या सरी घेत अंगावरी
भक्तीरसात ओलेचिंब होऊनी।
तुळशीच्या सुगंधात न्हावूनी
टाळ-मृदुंगाच्या गजरात रंगूनी

नामाच्या जयघोषात,विण्याच्या तालावरी
अभंगाच्या सुरात,कीर्तनाच्या साथीत
पताका-दिंडी नाचवीत
पंढरीला जाण्याची आस मानसी

इथे नाही कोणी सान-थोर
नाही जात-धर्म भेद्।
विठुराया जीवाचे जीवन
प्राणसखे सगेसोयरे हे सर्व हरीजन

अंगी नसेल बळ,परि हरीनामाचा धीर
गोडी ऐशी नामात,देई वैराग्याचे बळ।
पडी संसाराचा विसर
मनी परमार्थाची ओढ

चंद्रभागेतीरी भक्तांचा महापूर
कटीवर ठेवूनी हात,पाठीशी उभा पांडुरंग।
सुखाचा सोहळा,विष्णुमय जग
अहंभाव झाला क्षीण,विठूरायाच्या पायी समाधान...

– **प्रिया शांताराम मुन्हे** (एम.ए.राज्यशास्त्र प्रथम वर्ष)

GO TO INDEX

छत्रपती संभाजी महाराज युवकांचे प्रेरणास्थान

रविंद्र नागेश शिंदे (११ वी, जे)

कृष्णा–भीमेच्या सह्याद्रीला कुस तुझी अखंड ।
आई जिजाऊ तुज वंदन करण्या हा महाराष्ट्र उदंड।।

अशा ह्या माँसाहेब जिजाऊ ज्यांनी या महाराष्ट्राला घडवलं अन् ह्या सह्याद्रीला दोन अनमोल रत्नं बहाल केली.

निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू, श्रीमंतयोगी ।

असे राजे शिवछत्रपती ज्यांनी या महाराष्ट्राच्या मातीमध्ये हिंदवी स्वराज्याचं देखणं स्वप्न साकार केलं. ज्यांच्या बुलंद बाहूंवर हे स्वप्न साकारलं ते मावळ मातीतील मावळे. आणि या अखंड महाराष्ट्राचे गडकोटांचे शिलेदार या सर्वांच्या रक्ताचं सार्थकी लावण्याचं काम छत्रपती संभाजी महाराजांनी केलं.

इथे झुकले देवत्वही त्या शुरत्वाच्या तेजात ।
शंभू नृपा शत प्रणाम करितो, पुरंदराच्या खोऱ्यात ।।



सह्याद्रीने पुन्हा एकदा रणशिंग फुंकावे, कोकणकड्याची तळपती तलवार हाती घेऊन रणधुरंधर, गर्जावे, गनिम, फितुरांच्या रक्त चिळकांड्यांच्या अभिषेकाने टकमक अन् विंचुकडा पुन्हा एकदा न्हाऊन निघावा, तोफांच्या सलामीने दर्या पुन्हा उसळावा, गोवा जंजिकरांना पळती भुई थोडी होई, दिल्लीच्या तख्तालाही घाम फुटावा अन् शिवाग्नीने सारा महाराष्ट्र पेटवावा एवढं सामर्थ्य कोणाच्या मनगटात असेल तर ते छत्रपती संभाजी महाराज.

हा इतिहास आजही सांगते ती भिमा भामेच्या हातात हात घालून हंबरडा फोडणारी ती इंद्रायणी. ज्या इंद्रायणीने त्या ज्ञानोबा, तुक्याला आपल्या उदरात सामावून घेतलं अन् त्याच शंभुतीर्थाला आजही कवेत घेत या महाराष्ट्राच्या हीन, दीन लाचार अन् दुबळ्या तरुणाला आजही ती इंद्रायणी स्वराज्य धर्माची अन् तारुण्याच्या उसळत्या रक्ताची शौर्यगाथा सांगते.

उपनिषदांनी सांगावं आशिष्ठो, द्रडिष्ठो, बलिष्ठो या उक्तीने तारुण्याची सांगड घालावी आणि ती संपूर्ण उक्तीच ज्यांनी आयुष्यभर आचरावी असा हा या स्वराज्याचा राजा. आज आमच्या तरुणांमधून जेव्हा तारुण्याचे तीन 'त' फार नाहीसे होतात. तेव्हा तेजस्विता, तपस्विता अन् तत्परतेचा सुरेख त्रिवेणी संगम या महाराष्ट्राच्या या शिलेदारांत झालेला दिसतो आणि ह्याच रणधुरंधरी आयुष्याला अमरत्वाची कवाडेही खुली होतात.

म्हणूनच मी आजच्या तरुणाला सांगू इच्छितो वयाच्या नवव्या वर्षी राजे जेव्हा पुरंदरासारख्या तहाला सामोरे जातात तेव्हा राजे शिवछत्रपती शंभुराजांना म्हणतात 'बाळराजे, तुम्हाला जयसिंगाची सरदारकी पत्करावी लागेल अन् एवढंच नाही, तर औरंगजेबाची सप्तहजारी मनसबदारीही स्वीकारावी लागेल. या कुठल्याही शब्दाला प्रतिउत्तर न देता स्वत:च्या आयुष्यावर पाणी फिरवून या स्वराज्यासाठी स्वत: वनवास झेलणारा तो मराठी जणांचा कैवारी होता.

त्याच वयात राजे जेव्हा आग्रा भेटीला सामोरे जातात, तेव्हा दरबारी असताना औरंगजेब राजेंना प्रश्न विचारतो, 'क्यों राजन् आपको हमसे डर नहीं लगता क्या?' त्या वेळी शंभुराजे चटकन उत्तरतात, 'हम को किसीसे भी डर नहीं लगता लेकिन हमारी वजहसे सबको डर लगता है ।' त्यावेळी राजे आम्हाला सांगून जातात. तारुण्य ही अवस्था नाहीतर ती एक स्थिती आहे.

आयुष्याच्या अन् महाराष्ट्राच्या रणांगणावरच शंभुराजे नावाजले गेले नाही, तर तोच नेकदील राजा एक उत्तम पंडित, विद्यासंपन्न वैदिक एक उत्तमोत्तम साहित्यिक आणि कवीही होता. संपूर्ण आयुष्याचं रणांगण करून ह्या महाराष्ट्राच्या मातीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपणारा, झटणारा, झगडणारा अन् वेळ आली तर याच मातीत अन् याच मातीसाठी मरणारा तो या मराठी जनांचा स्वाभिमान होता. ह्याच राजामधला कवी जागृत होतो अन् 'बुद्धभूषण'सारखा राजनीतीपर ग्रंथ लिहितो त्यावेळी आम्हाला सुमित्रानंदन पंतांच्या काही ओळी आठवतात.

वियोगी होगा पहला कवी आहसे उपजा होगा गान ।
उमडकर आँखोसे चुपचाप वही होगी कविता अनजान ।।

जेव्हा औरंगजेबासारखा विश्वधुरंधर बादशहा दख्खन जिंकण्या जीवाचं रान करतो. २७ वर्षे ज्या दख्खनने त्याला सळो की पळो करून सोडलं. बादशाही पदाचा किमांश म्हणजे पगडी आयुष्यभर ज्या दख्खनने घालू दिली नाही अन् नीच औरंग्या, या दख्खनसाठी याच सह्याद्रीच्या कुशीत गेला पण दख्खन हाती लागला नाही आणि

GO TO INDEX

हाच दख्खन ज्यांनी आयुष्यभर लढवला ते हेच छत्रपती शंभुराजे.

सागरालाही उधाण यावं, गलबतं धावत सुटावी, तोफांच्या रणधुमाळी सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यांत घुमाव्या, कृष्णा-भीमेनेही दहाडं फोडावी, गडकोटांनी निधडी छाताडं पुढं करावी, एका एका मावळ्यानं आयुष्याचा. गडकोट करावा असा लढत होता हा महाराष्ट्र त्या औरंग्याबरोबर आणि ठणकावून सांगत होता त्याला-

हम उछलते है तो तुफान उँछल आता है,
हम मचलते है तो तुफान मचल जाता है,
हमको बदलने की कोशिश मत करो यारो
हम बदलते है तो पुरा इतिहास बदल जाता है ।

या शब्दांची जाण ठेवणारा तो महाराष्ट्र त्या औरंग्यासारख्या शत्रूला पायदळी तुडवलं अन् त्याच 'शंभुराजांनी' या महाराष्ट्राचा ९ वर्षांचा इतिहास लिहिला. तेव्हा त्या सह्याद्रीलाही वाचा फुटते अन् बोलू लागतो.

मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।

आजच्या गर्भगळीत झालेल्या तरुणाला आज ह्याच शंभुविचारांची गरज आहे. या स्वराज्यासाठी देहाचे रति रति तुकडे पडले आणि याच मातीचा याच मातीत गेला. अरे तो शत्रू औरंगजेबही शंभुराजांबद्दल बोलू लागतो. ''अरे मारणारा तर मेला; परंतु मेलेला अमर झाला.'' म्हणूनच हेच रणधुरंधरी आयुष्य या भारताच्या तरुणांचं प्रेरणास्थान आहे. दाढी वाढवून, गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घालून कपाळाला चंद्रकोर लावून कोणी शंभुराजे अन् शिवाजीराजे होत नाही. त्यासाठी त्यांच्या विचारांची गरज लागते. शिवचरित्र आणि शंभुचरित्र डोक्यावर घेऊन नाचायची गोष्ट नाही, तर ते डोक्यात उतरवण्याची गोष्ट आहे.

नातं बाप लेकीचं

पोरगी म्हणजे असते वडिलांची जान
तिची वाहवा झाल्यावर उंचावते बाबांची मान
स्वतः मात्र वापरतात शर्ट-पँट जुनी
मुलीसाठी आणतात भांडी-नि खेळणी
पोरगी म्हणजे असते बाबांची लाडकी पुरी
बाबांमुळेच असते तिची दुनिया लय भारी
बाबा आहेत माझे पहिले गुरु
त्यांच्यापासूनच होते माझी दुनिया ही सुरु
माझ्यासाठी बाबा आहेत खरे हिरो
माझ्या लेखी बाबांना मार्क आहे शंभर
आणि बाकिच्यांना झिरो
चूक झाल्यावर बाबा बघतात डोळे वटारुन
मारत नाहीत कधी पण चूक सांगतात समजावून
पोरीसाठी आणतात लाखात एक स्थळ शोधून
मुलीला आनंदी ठेवणारा जावई शोधताना
जातात बाबांचे पाय झिजून
पोरगी सासरी जाताना आतून बाबा जातो खचून
पण सासरी कशाची ही कमतरता न भासे।
म्हणून देतो सर्व आंदण
माझ्यासाठी बाबा आहेत प्रभु श्री राम
अशा माझ्या लाडक्या बाबांना माझा शतशः प्रणाम !!

– मोनिका रामचंद्र कुंटे
(द्वितीय वर्ष वाणिज्य)

ती

ती आहे 'सावित्री', स्त्रीशिक्षणाची कवाडं उघडणारी
ती राणी 'लक्ष्मीबाई' रणांगणी लढणारी
तिनेच शिवबा घडविला, तिच्यामुळे या अस्तित्वाला अर्थ
तीच जन्म देते येथे, तिच्याविना वांझ हा पुरुषार्थ

ती एक 'कल्पना', अंतरीक्ष भेदणारी
'सिंधुताई' झालेसी माय अनाथांना मायेची ऊब देणारी
कधी काट्यातील सुंदर गुलाब ती, तर कधी नाजूक जाई
ती असते प्रत्येक घरातील एक हृदयप्रिय एकनिष्ठ आई

ती आहे संगीतातली 'लता', ती कवितेतली बहिणाबाई
ती गरीबांची 'मदर तेरेसा' अन् समाजाची 'पंडिता रमाबाई'
किती गाऊ मी तिच्या वैचारिक प्रगल्भतेचे गुणगान
येथील प्रत्येक स्त्री आहे या भारतभूमीचा स्वाभिमान

बापाची ती परी ती आनंदाची शिदोरी, ती पावसाच्या सरी
ती एक प्रेयसी, अन् त्या शायराची शायरी
प्रत्येक नात्याला जपणारी 'ती' एक कर्तव्यदक्ष नारी

जगाची बंधने तोडून सारी
येथेच घे तू उन्मुक्त भरारी
घे तू उन्मुक्त भरारी...

– शुभांगी मधुकर शिंदे, (T.Y.B.Sc.-Zoology)

GO TO INDEX

आजची स्त्री खरंच स्वतंत्र आहे का?

अस्मिता पायनाईक M.A. II (मराठी)

आजच्या युगामध्ये स्त्री ही पुरुषाएवढीच आघाडीवर असलेली आपल्याला पाहावयास मिळते. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात ती पुरुषांच्या बरोबरीने काम करताना प्रगतीपथावर आहे. अर्थार्जनामध्येही ती पुरुषाएवढीच, किंबहुना त्यापेक्षाही जास्त कष्ट करताना दिसते. साहजिकच पूर्वीपेक्षा आत्ताच्या युगात स्त्रीला समाजात मोठे स्थान प्राप्त झाले आहे. ते तिने स्वत:च्या कर्तृत्वाने, कष्टाने, बुद्धिमत्तेने मिळविलेले आहे यात शंकाच नाही.



एकूण सर्वच बाबतीत स्त्रिया ह्या पुरुषांच्या बरोबरीने आघाडीवर आहेत. हे जरी खरे असले, तरी या सर्व गोष्टी काही ठराविक वर्गापुरत्या मर्यादित आहेत. काही ठराविक स्त्रियांच्या बाबतीत खऱ्या आहेत. स्त्री सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहे असे म्हटले तरीही तिच्यावर अन्याय होताना आजही दिसून येतोच आहे. आजही वर्तमानपत्र उघडले की, जास्तीत जास्त स्त्रियांबाबतच्या अन्यायाच्या बातम्या जास्त असतात.

सुशिक्षित वर्गातही पत्नी सुगरण, सुस्वभावी, समजूतदार असली तरीही तिला मुलीच झाल्या तर तो दोष तिचाच समजून पतीचा दुसरा विवाह लावला जातो. मुलगा व मुलगी होणे हे स्त्रीच्या हातात नसते हे न कळण्याइतपत समाज मागासलेला तर आता नाही ना? तरी पण या ठिकाणी काही गुन्हा नसताना स्त्रीला अन्याय सहन करावा लागतो. साधारणपणे लग्नाला ५-६ वर्षे झाली व घरात पाळणा हलण्याची चिन्हे दिसली नाहीत की योगीबाबा, डॉक्टर तपासण्या चालू होतात. त्यात प्रथम स्त्रीच्याच केल्या जातात. मूल जन्माला येण्यासाठी दोघेही तेवढेच जबाबदार असतात, पण स्त्रीला प्रथम दोष येतो. का? तिच्यात काही दोष नाही असे समजल्यास कसातरी तयार होऊन पुरुष डॉक्टरकडे जायला तयार होतो. या चाचण्यांत स्त्रीच्यात दोष निघाला तर पुरुष या कारणावरून तिच्या संमतीने अथवा तिच्याशी घटस्फोट घेऊन दुसरे लग्न केल्याचे आपल्याला आढळते.

ऐन तारुण्यात पतीच्या अपघाती निधनाने विधवा झालेल्या मुली आपण पाहातो. मूलबाळ नसेल तर ठीक, किमान दुसऱ्या लग्नाचा विचार तरी केला जातो. पण जर पदरी लहान एक-दोन मुले असतील तर तिला आपले उभे आयुष्य एकटीने काढावे लागते. तरी ती त्या लहान मुलांना सांभाळत त्यांचे सगळे करते. मुलांना व्यवस्थित वाढवून त्यांचे शिक्षण वगैरे करून त्यांना मोठ्या हुद्द्यावर बसविलेल्या मातांची अनेक उदाहरणे आपण पाहातो. पण हेच जर एखाद्या पुरुषाबाबतीत त्याची पत्नी अचानक सोडून गेली, तर एका वर्षाच्या आतच त्याच्या दुसऱ्या लग्नाची बोलणी सुरू केली जातात. मुलांना कोण सांभाळणार, घरातले कोण करणार, स्वत:ची सर्वच गरज भागवण्यासाठी दुसरे लग्न करतो. त्यामध्ये त्याचा स्वार्थच असतो खरे तर! स्त्री आपल्या पतीच्या प्रेमाखातर त्याच्या आठवणींवर सगळे आयुष्य काढण्यास तयार होते. त्याच्या मुलांना मोठे करते. स्वत:चा विचारही ती कधी करत नाही, पण पुरुषांचे तसे नसते.

आपला समाजही त्यास तेवढाच जबाबदार आहे. एखाद्याची पत्नी तरुण वयात गेली की, लगेच त्याला वर्षाच्या आत लग्नासाठी प्रस्ताव येतात. मुलांना सांभाळायला, घरात लक्ष्मी हवी. एकटा किती दिवस राहाणार, पण असा प्रस्ताव तरूण विधवेकडे क्वचितच अपवादाने पाहायला मिळतो. नाही तर तिलाच तूच पांढऱ्या पायाची म्हणून नवऱ्याला घालवून बसलीस असा आरोप तिच्यावरच करण्यात येतो. स्त्री ही लग्न करून तुमच्या घरी आपले माहेर, बहीण-भाऊ, आई-वडील यांना सोडून येते. तुमच्या घरची जबाबदारी उचलते. तुमच्या मुलांना जन्म देते. त्यांना मोठे करते. वेळप्रसंगी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहाते. एकटा पुरुष किंवा स्त्रीही फारसा पराक्रम नाही गाजवू शकत. दोघांनाही एकमेकांची साथ सारखीच हवी असते. हा संसाररूपी रथ एका चाकाच्या साहाय्याने चालवता येत नाही तरीसुद्धा कायम स्त्रीवरच अन्याय का? आपला समाज कितीही बदलला तरी स्त्रीवर होणारे अन्याय कधी संपणारच नाहीत का? पेपरमध्ये रोज नवविवाहतेच्या आत्महत्या. सुनेचा छळ करून मारले, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची निर्घुण हत्या अशा बातम्या येणे कधी थांबेल?

ह्या स्त्रीवरील अन्यायाला जबाबदार कोण? तिला कधी न्याय मिळेल की नाही? याला उत्तर सापडेल की नाही? असे अनेक प्रश्न आपल्या आधुनिक समाजातही अनुत्तरीतच राहात आहेत. सर्व क्षेत्रांत सतत पुढे जाण्यासाठी धावणारा आपला समाज स्त्रियांच्या बाबतीत मागे का जातो? हीच आज आपल्या समाजाची मोठी खंत आहे. कोणीतरी येईल ही परिस्थिती बदलेल या आशेवर कधीपर्यंत राहाणार आपण? यासाठी जास्त काही करण्याची पण गरज नाही. आपण प्रत्येकाने आपल्या आजूबाजूला असणाऱ्या स्त्रियांबद्दल मनात आदर ठेवून त्यांना मानापानाची वागणूक दिली तरी खूप फरक पडू शकेल. आपली आई, बहीण, बायको, मुलगी यांना माणूस मानून त्यांच्यात भेदभाव न करता वागले तरी खूप काही घडेल. कारण परिवर्तन नेहमी आपल्यापासून सुरू केले तर त्याचा फायदा जास्त होतो.

GO TO INDEX

वसुंधरा वाचवा – पृथ्वीचे वाढते तापमान रोखा

पुष्कर सुनील पाटील (एस.वाय.बीएस.सी.)

पृथ्वीवर माणूस प्रगती करत असताना, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जाळ्यात माणूस इतका काही हरवून गेला की, आपल्या पर्यावरणाला विसरूनच गेला. विकास हा महत्त्वाचा आहे, पण आपला निसर्गही तेवढाच महत्त्वाचा आहे, हे विसरला, पण निसर्गाने पण आपली ताकद दाखवली आहे. पर्यावरणाची जी हानी झाली त्यामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण झाले. त्यामुळे प्रगती करताना पर्यावरणाचे भान राखणे आवश्यक आहे.



पृथ्वीवरील प्रत्येक सामान्य माणसाने जगातील तापमान वाढीबद्दल जागरूक असणे आवश्यक आहे. पृथ्वी दिवसेंदिवस जळत आहे. काही काळापासून विचार केला, तर पावसाळ्यात ऊन असते, उन्हाळ्यात पाऊस, तर हिवाळ्यात ऊन असते. सगळ्या प्रदूषणाच्या समस्या मोठ्या प्रमाणात भोगाव्या लागत आहेत. पृथ्वीचा ओझोन थर विरळ होत असल्याने पृथ्वीवरील तापमान वाढत आहे.

लोकसंख्या वाढली, लोकांना राहाण्यासाठी जागा नाही. गावातील माणसे शिक्षणासाठी, कामासाठी शहरात जात आहेत. जागेच्या अभावामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली आहे. कारखाने उभे केले जात आहेत. पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे जलसंवर्धनात कमतरता भासत आहे. वृक्षतोडीमुळे ऋतुमान बिघडले आहे.

डोंगराचे सपाटीकरण करून तेथेही इमारती उभ्या केल्या जात आहेत. मोबाईल टॉवर बसविले जात आहेत, कारखाने उभे केले जातात. वाढत्या लोकसंख्येने कार्बन–डाय–ऑक्साईड वायूचे प्रमाण वाढत आहे.

जागतिक तापमान वाढ रोखायची असेल तर जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत.

पर्यावरणाचा कोणी विचार केला तर त्या होत्या स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी. ज्यांनी अभयारण्याचे जाळे पसरून मोठ्या प्रमाणात काम केले आहे आणि वृक्ष मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. जागतिक तापमानवाढीवर मोठ्या प्रमाणात चर्चा होते, पण तेथे अमेरिकेसारखी महासत्ता या प्रश्नापासून दूर जात आहे. अमेरिका नाही तर प्रत्येक राष्ट्र कोणतेही पाऊल ठोसपणे उचलत नाही.

सौरऊर्जा प्रकल्प हे सध्याच्या काळात अत्यंत महत्त्वाचे आहेत. हे अपारंपरिक स्रोत हे पर्यावरण प्रदूषणाला पर्याय ठरू शकतात. त्यामुळे प्रदूषण तर कमी होईलच, पण आर्थिक प्रगती व्हायलाही प्रोत्साहन येईल.

वाढती वाहनसंख्या हा एक मुख्य त्रास, ज्याने प्रदूषण वाढते. त्यासाठी सीएनजी, इलेक्ट्रिकल गाड्या हा एक अत्यंत चांगला उपाय. वाढत्या तापमानामुळे हिमनद्या मोठ्या प्रमाणात वितळत आहेत, तर समुद्रपातळी वाढत आहे. अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. केरळमध्ये महापूराने जे थैमान घातले त्यावरूनच परिणाम किती भयंकर आहे हे जगाने पाहिले आहे.

कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी जो करार झाला त्यावर अंमलबजावणी झाल्यास नक्कीच फायदा होईल असा विश्वास वाटतो.

पर्यावरण संवर्धनाचा विचार करून शाश्वत विकासाच्या, संकल्पनेचे पालनपोषण करायला हवे आणि कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हायला हवी.

अबोल प्रेम

प्रेम माझे डोळ्यांतले टिपून घेशील का?
प्रेम मनीचे माझे जाणून घेशील का?
प्रेम हृदयातले माझे
तुझ्या हृदयात ओढशील का?
नाहीच झाले काही तर
खोटे–नाटे मी तुझ्यावर प्रेम
करतो हे बोलशील का?
नाहीच झाले बोलणे तर
डोळ्यांनी खुणावशील का?
नाही झाले खुणावणे तर
मान डोलावशील का?
नाहीच झाले काही तर
चितेवर माझ्या दोन अश्रू ढाळशील का?
समजेन मी होते प्रेम माझे अबोल
पण अश्रूने वाहणाऱ्या
माझ्या नयनांना तुझ्या प्रेमाची
एक नजर देशील का?

– **चेताली विश्वनाथ गायकवाड**
(एम.ए. मराठी भाग – १)

सोशल मीडिया आणि तरुणाई

राजेश चंद्रकांत रिठे (एम.ए. मराठी – प्रथम वर्ष)

सोशल मीडिया आजचा परवलीचा शब्द. एका शब्दात ओळख करून द्यायची झाली, तर त्यासाठी समर्पक शब्द आहे, 'जगण्याचं व जगविण्याचं साधन'. सोशल मीडियाबद्दल सर्वसामान्य जनतेत कुतूहल वाढत आहे. उत्साह व नवचैतन्याचा झरा अर्थात आजची तरुणाई मग कशी मागे राहाणार? फेसबूक, ट्विटर, ऑर्कूट, इन्स्टाग्राम इत्यादी सोशल मीडियाच्या साईट्स तर तरुणांच्या गळ्यातील ताईतच बनल्या आहेत. आजची तरुणाई सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त होत आहे.



सोशल मीडियाचा सगळ्यात मोठा फायदा म्हणजे जगाच्या कानाकोपऱ्यातील कोणत्याही व्यक्तीशी तुमचा थेट संवाद होऊ शकतो. थेट संवादाचा फायदा वेगवेगळ्या क्षेत्रांतील तुमचे ज्ञान वाढवण्यापासून व्यवसायवृद्धीपर्यंत कसाही होऊ शकतो. सर्व प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचाही लाभ तरुणाई अगदी सहजपणे घेऊ शकते. संगीत, सिनेमा, वाचन, नाट्य, कला, ट्रेकिंग, फोटोग्राफी अशा विविध गोष्टींची आवड असणाऱ्या तरुणाईला सोशल मीडिया म्हणजे माहितीचा आणि माहितगारांचा खजाना आहे. शैक्षणिक, नोकरी व्यवसाय, सांस्कृतिक आणि विविध छंद अशा अनेक क्षेत्रांतील माहिती घरबसल्या मिळणे हे तरुणाईला मिळालेले वरदान आहे.

व्यक्तिमत्त्व विकासासाठी वेगवेगळ्या विषयात रुची असणे ही बाब आजच्या तरुणाईला सोशल मीडियाच्या माध्यमातून उमगली आहे. सोशल मीडियामुळे तरुणाईस नव्यानव्या गोष्टींची ओळख झाल्यामुळे त्यांचा स्वत:कडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे. त्यामुळे व्यावहारिक कौशल्य आणि जीवनविषयक दृष्टिकोन समृद्ध होत राहातो. सोशल मीडियावरील वेगवेगळ्या विषयांवरील चर्चा हा एक स्वतंत्र विषय आहे. तरुण वर्गासाठी ही चर्चा, एखाद्या मुद्द्यावरील सर्व प्रकारची मते वाचणे व आपले स्वत:चे मत तयार करणे यासाठी फारच उपयोगी आहे. सर्व विषयांवर स्वत:ची मते हवी असणारी व ती भीडभाड न ठेवता मांडणारी ही पिढी आहे.

घडत्या वयात बनत जाणाऱ्या मतांचा तरुणाईच्या उभ्या आयुष्यावर परिणाम होतो. परिणामी प्रभावीपणे व सद्सद्विवेकबुद्धीने तरुणाईने सोशल मीडियाचा वापर केला, तर भावी समाजाविषयी कोणतीही काळजी करणे गरजेचे नाही. शिवाय त्यामुळे अचूक व नेमक्या शब्दांत आपले मत मांडण्याचे कौशल्य तरुणाईत नकळत वाढते. सोशल मीडिया ही तरुण पिढीला मिळालेली एक सुंदर संधी आहे व त्याचा पुरेपूर वापर करून घेताना ह्या तरुणाईला पाहाणे हा एक निखळ आनंदाचा भाग आहे. अशाप्रकारे सोशल मीडिया आणि तरुणाई हे एक घट्ट ऋणानुबंध झाल्यास त्याचा उपयोग व्यक्ती, समाज आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच होणार आहे.

आणखी एक महत्त्वाचा फायदा तरुणाईला या सोशल मीडियाच्या माध्यमातून होणार आहे. तो, एखाद्या मुद्द्यावर स्वत:ची भूमिका ठरवायचा, न पटलेल्या गोष्टींबद्दल निषेध, आंदोलन इ. करण्याचे सध्याचे हिंसक मार्ग सर्वांनाच आवडतात असे नाही, पण आंदोलनामागील भूमिका पटत असते. अशा वेळी या सोशल मीडियाच्या माध्यमातून खूप तरुणाई व्यक्त होत असते. अशी भूमिका घेता येणे हे व्यक्तिमत्त्वाची कणखरता वाढविण्यासाठी अतिशय मदत करते. स्वत:ची स्वत:ला अशी ओळख होणे हे घडत्या वयात खूप गरजेचे आहे. सोशल मीडियामुळे ही संधी शांततामय मार्गाने तरुणाईला मिळवून दिली आहे.

पूर्वीच्या काळात माहितीचे स्रोत मर्यादित होते. तेव्हा शाळा/कॉलेजमध्ये गेल्याशिवाय शिक्षण शक्य (च) नाही असं वाटणं साहजिक होतं. आज माहितीचे स्रोत घरात, खिशात, हातात येऊन पोहोचले आहेत. फक्त ही माहिती 'प्रोसेस'करणे आणि 'अप्लाय' करणे अर्थातच योग्य प्रकारे याच तरुणाईला मार्गदर्शन करण्याची गरज आहे. सोशल मीडियाचे अनेक फायदे सर्व थरांतील तरुण वर्गासाठी आहेत.

तरुणाईसाठी सोशल मीडिया घातक असल्याची सातत्याने दवंडी पिटवली जात असली, तरी सोशल मीडियाचा योग्य वापर करण्यासाठी शासन आणि प्रशासनही वेळोवेळी योग्य ती खबरदारी घेत आहे. तथापि काही वेळेस सोशल मीडियाचा गैरवापर होत असल्याच्या घटनाही आढळून येतात. त्यामुळे 'सोशल मीडिया – तरुणाईसाठी शाप की वरदान' असाही प्रश्न उपस्थित केला जातो. त्यामुळे शिस्त

पाळणे अत्यंत आवश्यक आहे. काही जणांना ही शिस्त मान्य नाही. दुर्दैवाने अशी मंडळी कायद्याच्या कचाट्यात अडकतात.



सोशल मीडियाचे आज केवळ शहरातीलच नव्हे, तर गावस्तरापर्यंतच्या तरुणाईत मान्यता पावून प्रसिद्ध झाले आहे. अन्न, वस्त्र, निवारा यांच्याइतकेच सोशल मीडियाही आता जीवनावश्यक बाब होऊन बसली आहे. जर एखाद्या तरुणाला एकांतात ठेवले, तर तो म्हणेल, ''बाकी काही नको, पण सोशल मीडिया चालू राहील असे पाहा.'' सोशल मीडिया हे विज्ञानाचेच अर्थात पर्यायाने मानवाचेच अपत्य आहे. मानवाने आपला विकास साधण्यासाठी त्याचा आधार घेतला, आदर्श ठेवला. ज्ञानाच्या प्रकाशाची बरोबरी इतर कोणताही प्रकाश करू शकणार नाही, असे म्हटले जाते. त्यामुळे तरुणाईने समता पसरविण्यासाठी, अंधश्रद्धा-अनिष्ट रूढी दूर करण्यासाठी, व्यापक जनहित व पर्यायाने राष्ट्रीय एकात्मतेसाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करणे अपेक्षित आहे.

गतकाळातील "India Against Corruption", ''निर्भया'' इत्यादीसारख्या व्यापक व जनहितार्थ चळवळी या सोशल मीडियाचे फलद्रूप स्वरूप आहे- सोशल मीडियाचे हे अचाट सामर्थ्य जाणून काही समाजकंटक मंडळी वैयक्तिक फायद्यासाठी सत्यापासून दूर सरकतात. त्यामुळे काही तरुणाई वेगळ्याप्रकारे व्यक्त झाल्याची देखील उदाहरणे आहेत. अशा काही वेळी तरुणाईने सोशल मीडियाच्या त्या घटनांपासून सावध राहिले पाहिजे. सोशल मीडियाचा हा धोका लक्षात घेऊन तरुणाई विचारपूर्वक वागल्यास खरोखरच सोशल मीडिया हे आदर्शवत मार्गदर्शक तथा जगण्याचे व जगविण्याचे साधन ठरेल.

सोशल मीडिया व तरुणाई याबाबत पालकांची वेगवेगळ्या प्रकारची मते आढळून येतात. ते म्हणतात, 'वेड लागलं तरुणाईला'. अगदी सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत 'लाइक अँड शेअर'. अशावेळी 'आखिर क्यों?' या हिंदी चित्रपटातील गीतकार इंदिवर यांच्या गीतातील पुढील ओळी आठवतात...

''दुश्मन न करे दोस्त ने वो काम किया है ।
उम्रभर का गम हमें इनाम दिया है ।''

सोशल मीडियाने तरुणाईच्या जीवनाला विलक्षण गती लाभली आहे, शक्ती वाढवली व ऐश्वर्यही वाढवले आहे. अशा प्रकारे तरुणांच्या जीवनात सोशल मीडियाला फार महत्त्व आहे. याचा वापर करून तरुणाईने व्यक्तिश: समाज व राष्ट्रनिर्मितीसाठी खारीचा वाटा उचलला पाहिजे. ही देखील एक प्रकारची देशसेवाच आहे. आपण ज्या समाजात राहात असतो, त्या समाजाचे आपण ऋणी असतो. मालात भेसळ करणारे, माल दडवून ठेवून कृत्रिम टंचाई निर्माण करणारे, मुलांना पळवून वाम मार्गाला लावणारे, भ्रष्टाचारी, बुवाबाजी-भोंदूगिरी करून फसवणाऱ्यांना शोधून काढून समाजाला पीडा देणारी ही कीड नाहीशी करण्याचे काम सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणाई नक्कीच करू शकते.

''ममतेशिवाय समता नाही'' हे त्रिकालाबाधित सत्यवचन असून, त्यासाठी सोशल मीडिया आणि तरुणाई या जोडीने एकदिलाने काम करणे ही काळाची गरज आहे.

❀❀❀

माझे प्रेमळ बाबा

पतंगा रे पतंगा थोडा तू थाबंना
बाबा माझे देवाघरी त्यांना निरोप सांग ना
मला येते पप्पांची खूप खूप आठवण
पण कोणाला सांगू मनात बसले आहे
सर्व दु:ख साठवून
कायम भासत राहिल मला तुमचीच उणीव
म्हणूनच मी स्वत:ला तुम्ही पाठीशी आहात
याची करून देते जाणीव
कुठेतरी भेटाल अशी आहे मनी आस
सदैव होतो मला तुमचाच भास
तुम्ही आहात पाठीशी याचे आहे मला भान
पप्पा तुम्ही आहात सर्वात छान म्हणूनच
मी गाते तुमचे गुणगान
मला आहे माझ्या चुकांचा पश्चात्ताप
छोटी समजून मला कराल का तुम्ही माफ ?
परत एकदा मला तुमच्या कुशीत सामावून घ्याल का ?
देवाशी भांडून माझ्याकडे परत एकदा याल का ?

- मोनिका रामचंद्र कुंटे (द्वितीय वर्ष वाणिज्य)

मॉडर्न - आयुष्यभराची शिदोरी देणारे ज्ञानमंदिर

शिल्पा त्रिंबक जाधव (M.Sc. Statistics - Part II)

दिनांक २३ फेब्रुवारी २०१९ ला कॉलेजने एम.एस्सी. (स्टॅटिस्टिक्स) च्या विद्यार्थ्यांचे गेट टुगेदर आयोजित केले होते. यामध्ये २००९-२०१९ पर्यंतचे सर्व विद्यार्थी उपस्थित राहिले होते. कार्यक्रम दुपारी ४ वाजता सुरू होणार होता. लेक्चरला नेहमी उशिरा येणारे विद्यार्थीही आज मात्र वेळेच्या अगोदर उपस्थित राहिले होते. कोणी आपल्या साथीदाराला तर कोणी आपल्या मुलांना घेऊन आले होते. सगळ्या विद्यार्थ्यांमध्ये खूप बदल जाणवत होता. बदलले नव्हते ते फक्त कॉलेज आणि शिक्षक.

मी बी.एस्सी. पर्यंतचे शिक्षण बारामतीमध्ये केले आणि एम.एस्सी. साठी पुण्यात आले, मॉडर्न कॉलेजमध्ये एम.एस्सी. ला ॲडमिशन घेतले. खरेतर या एम.एस्सी. च्या दोन वर्षांमध्ये आयुष्यभर उपयोगी पडतील अशा खूप काही गोष्टी शिकायला मिळाल्या.

एकदा माझे आणि माझ्या मनाचेच भांडण सुरू झाले. माझे मन मला म्हणाले, 'शिल्पा एम.एस्सी. झालीस. आता तू स्पर्धेच्या जगात पाऊल टाकणार. तुला काय वाटते तू या दोन वर्षांत घेतलेल्या ज्ञानावर हे आयुष्य सुंदररीत्या जाणार का? मी म्हणाले, हो मी माझे आयुष्य अगदी सुंदररीत्या जगणार. कारण एम.एस्सी. करताना स्टॅटिस्टिक्सबरोबर आयुष्यभर उपयोगी पडतील अशा खूप गोष्टी शिकले आहे मी. Sampling Theory शिकविताना कापरे सरांनी शिकविले, आयुष्यात योग्य गोष्टींचे Sampling करायला. factor Analysis शिकविताना कांबळे मॅमने शिकवले, आयुष्यात योग्य factor कसे निवडायचे ते.

पण मन म्हणाले, अग आयुष्यात काही गोष्टी सांगून येत नाहीत त्या अचानक घडतात, पण काय करशील? मी म्हणाले, अरे Regrsssion शिकवताना उमराणी मॅमने शिकवले, आयुष्याचे योग्य prediction करायला. मन म्हणाले, पण कधी कधी काही गोष्टी तुझ्या हाताबाहेर असतील तर मग? मी म्हणाले यावरही आहे उपाय, कारण साने मॅमने Inference शिकविताना सांगितले आहे की, कोणतीही गोष्ट confidence bound च्या बाहेर असेल तर Hypothesis reject करायचे.



मन म्हणाले, शिल्पा तू समजतेस इतके साधे, सोपे नाही आयुष्य. आयुष्यात येतात खूप साऱ्या अडचणी आणि खूप सारे error मग काय करशील? मी म्हणाले, देशमुख मॅमने शिकविला आयुष्याचा programme run करायला तोही without error.

मन ही अगदी अचाट-भन्नाट, म्हणाले, अग पण इतके सारे करताना, नवीन गोष्टी शिकताना, तू दमशील, थकशील मग काय करशील?

मी म्हणाले, हो नवीन गोष्ट करताना, शिकताना मी दमेन, थकेन पण थांबणार नाही. कारण त्यावेळी आमच्यासारख्या २०-२२ वर्षांच्या तरुणांनाही लाजवेल इतका कामातील उत्साह असणारे दीक्षित सर आणि मराठे सरांना आठवेल.

मन म्हणाले की, एवढ्या सगळ्या गोष्टी आचरणात आणल्यावर तू नक्कीच यशाच्या शिखरावर पोहोचशील, पण त्यावेळी गर्वाने फुलून नाही ना जाणार. मी म्हणाले, छे! कधीच शक्य नाही. कारण आयुष्यात कितीही यशाचे शिखर गाठले, तरी सगळ्यांशी नम्रपणे वागायचे हे शिकले. मी आमचे प्राचार्य झुंझारराव सरांकडून. माझ्यापुढे माझ्या मनाने शेवटी हार मानले ते म्हणाले की, तुम्ही statistics चे विद्यार्थी तुम्ही हा आयुष्याच्या बुद्धिबळाचा डाव सहजच जिंकणार.

खरंच या एम.एस्सी.च्या दोन वर्षांमध्ये खूप काही शिकायला मिळाले. आयुष्यभर पुरेल अशी ज्ञानाची आणि अनुभवाची शिदोरी मिळाली. कॉलेजविषयी बोलताना मला रविंद्रनाथ टागोर यांच्या काही ओळी आठवतात.

जिथे शब्द सत्याच्या चाळणीतून
बाहेर पडतात,
जिथे शब्द आणि कृती एकमेकांच्या
हातात हात घालून चालू लागतात,
जिथे तेजोमय बुद्धिमत्ता आणि
तर्कशुद्ध प्रतिभा यावर प्रत्येक गोष्ट
घासून पाहिली जाते.
अशा माझ्या या ज्ञानमंदिरास,
आणि ज्ञानमंदिरातील प्रत्येक गुरुवर्यास
माझे वंदन!

GO TO INDEX

सोशल मीडियाची वाढती व्यसनाधिनता

संकेत ढमाणे (द्वितीय वर्ष विज्ञान)

सोशल मीडियाच्या जाळ्यात माणूस हरवलाय. एका आभासी जगात माणुसकीपण हरवली आहे. सोशल मीडियात सोशल मीडियाच्या आभासी जगात वावरताना वास्तवात जगायचं कसं हेच तो विसरलाय...



विज्ञान व तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे आज आपल्या दैनंदिन जीवनात प्रचंड प्रमाणात बदल घडून आला आहे. त्यातच समाजात संपर्कासाठी असणारी माध्यमही बदलली. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे पत्र, तार या माध्यमांची जागा आज ई–मेलने घेतली आहे. गेल्या एक दशकापूर्वी जागोजागी दिसणाऱ्या पी.सी.ओ आणि लँडलाईनची जागा सेलफोनने घेतली आणि पी.सी.ओ. आणि लँडलाईनला हद्दपार केले. पण तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे सेलफोनही जवळपास हद्दपार झाले आहेत आणि त्यांची जागा स्मार्टफोन ने घेतली आणि या स्मार्टफोनमधूनच जन्माला आला सोशल मीडिया. सोशल मीडियाचे वर्णन मला करायच असेल तर मी अस करेन की ''सोशल मीडियामुळे सातासमुद्रापलीकडे असणारे लोक हाकेच्या अंतरावर आले, मात्र हाकेच्या अंतरावर असणारी माणसं सातासमुद्रापलीकडे गेली.''

आज कट्ट्यावरच्या गप्पांची जागा व्हाटॲपवरच्या चॅटने घेतली आहे. कुटुंबासोबत बसून टिव्हीवर पाहिल्या जाणाऱ्या मालिकांची जागा कोपऱ्यात बसून एकांतात पाहिल्या जाणाऱ्या नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राईमवरच्या वेबसिरीजने घेतली आहे. सणसमारंभाच्या वेळी एकमेकांच्या घरी जाऊन घेतल्या जाणाऱ्या भेटीऐवजी सोशल मीडियावर दिल्या जाणाऱ्या शुभेच्छांना अधिक महत्त्व आहे. विविध कारणांसाठी घेतल्या जाणाऱ्या पत्रकार परिषदांची जागा हळूहळू ट्विटरवर केले जाणारे ट्विट घेत आहे. काळानुसार समाजात बदल होणं अनिवार्यच असतं. त्यामुळे हे बदल तर आपण स्विकारायलाच हवेत. परंतु एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आणि आपलं कुठल्याही प्रकारचं नुकसान होणार नाही याची योग्य ती काळजी घेऊनच. पण आपण सोशल मीडियाला केवळ स्विकारलच नाही, तर याला जीवनाचा अविभाज्य असा भागच बनवून टाकला. इतकं की समाज त्याच्या आधीन कधी झाला हे कळालसुद्धा नाही. व्हॉटसॲपवर चॅटींग करणं आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण आपलं स्टेटस् दाखवण्यासाठी स्टेटस्ला टाकणे, फेसबुकवर कमेंट करणे या सर्व गोष्टींचं समाजाला जसं काही व्यसनच लागलं आहे.

माध्यमातून पसरणाऱ्या अफवांमुळे देशभरात १०० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले तर ४० निरपराध लोकांना सोशल मीडियामुळे आपला जीव गमवावा लागला. सोशल मीडियावर फिरणाऱ्या एका बनावट चित्रफितीमुळे समाज इतका विवेकहीन, हिंसक झाला की भरदिवसा त्याने लोकांना दगडाने ठेचून मारायला सुरुवात केली. या हिंसक जमावाला आवर घालणं सुरक्षादलासाठी कठीण होऊन जातं. काश्मीरमध्ये तर दहशतवादी सुरक्षादलाविरोधात सोशल मीडियाचा अत्यंत प्रभावीपणे वापर करत आहेत. त्यामुळे या प्रक्षोभक जमावाला आवर कसा घालायचा हा देशाच्या अंतर्गतसुरक्षेसाठीचा सर्वांना मोठा प्रश्न आहे. परंतु सहिष्णुतेसाठी ज्ञान असणाऱ्या भारतीय समाजाला हे कृत्य अजिबात शोभत नाही. पण एवढा आजचा समाज प्रक्षोभक झाला कसा ? काय दोष होता त्या निरपराधा लोकांचा ? कायदा हातात घेऊन त्या लोकांचा जीव घेण्याचा अधिकार कोणी दिला ! अशा मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटनांमुळे मन सुन्न होऊन जाते आणि समाजात असुरक्षितता आणि भीतीचं वातावरण तयार होतं. व्हॉटसॲपच्या end to end encryption प्रणालीमुळे या सर्वांमागचा मुळ सूत्रधार शोधणं अत्यंत कठीण आहे. सोशल मीडिया आभासी विश्वात जगणारा हा समाज विवेकशुन्य झाला आहे.

ह्या वर्षीच्या पहिल्याच दिवशी एक जानेवारीला नववर्षाची पार्टी करून तरुण वयातील पती व पत्नी आपल्या एका मित्रासोबत रात्री दीड वाजता रस्त्यावर टॅक्सीची वाट बघत थांबले होते. तेव्हा काही गुंडांनी त्या तरुणीला छेडण्याचा प्रयत्न केला. संबंधित तरुणीच्या पतीने ते त्यांना हटकले असता त्याला मारहाण केली व त्या तरुणीचा

विनयभंग केला. त्यावेळी तिथे शंभर ते दिडशे लोकांचा जमाव होता. परंतु सर्वजण मात्र त्या प्रसंगाची छायाचित्र व चित्रफित आपल्या स्मार्टफोनमध्ये घेण्यात मग्न होते व ते सोशल मीडियावर टाकत होते. ना कोणी त्या गुंडांना रोखण्याचा प्रयत्न केला ना कोणी पोलिसांना बोलावले. तळपायाची आग मस्तकात पोहोचवणारी ही घटना आहे. अशा वेळी ती घटना रोखण्याऐवजी छायाचित्र व चित्रफित घेण्याचं काम कोणी कसं करू शकतं ? यापेक्षा मोठी मानवतेला काळीमा फासणारी दुसरी कोणती घटना असूच शकत नाही. यावरून कळत सोशल मीडियाने आपल्यातल्या भावनांना कसं मारुन टाकलं आहे.

एवढंच काय तर समाज आपल्यातला विवेक हरवून बसला आहे. समाजातील संवाद हरवला आहे आणि जिथे संवाद नसतो तिथे अशांतता निर्माण होते तिथे गदारोळ माजतो आणि समाज अस्थिर होतो, हिंसाचार वाढतो आणि विध्वंसक परिस्थितीत निर्माण होते. गेल्या काही महिन्यांपूर्वी अमेरिका व उत्तर कोरिया या दोन अण्वस्त्र सज्ञ राष्ट्रांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. या दोन्ही राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांच्या एकमेकांच्या ट्विटरच्या माध्यमातून अण्वस्त्रहल्ल्याची धमकी दिल्याने संपूर्ण जग हादरलं होतं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना तर सोशल मीडियाचं व्यसनच लागलय. अगदी ते आपले राष्ट्रीय धोरण, महत्त्वपूर्ण निर्णय मनात येईल तेव्हा ट्विटरवरूनच जाहीर करत असतात. त्यांनी घेतलेले निर्णय त्यांच्या सहकाऱ्यांनासुद्धा ट्विटरवर जाहीर झाल्यावरच कळतात. जर जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची ही अवस्था असेल तर मग सामान्यांचा काही प्रश्नच येत नाही !

आजचा समाज सोशल मीडियाच्या इतका व्यसनाधीन झाला आहे की त्यावर येणारे संदेश, छायाचित्र विविध चित्रफित यावर तो अगदी ''काळ दगडावरची रेष आहे.'' या प्रमाणे आंधळेपणाने विश्वास ठेवून त्याला खरं समजतो. सुशिक्षित लोकही याला अपवाद नाहीत. कुठलीही शहानिशा किंवा खात्री न करता ते इतरांना पाठवतात आणि काही वेळातच ते लाखो लोकांपर्यंत पोहोचतात आणि यामुळे आपण किती मोठ्या समस्येला निमंत्रण देतो याची त्यांना कदाचित कल्पनाही नसावी. अनेकजण यामुळे भावनिक हातोत, कोणाच्या भावना दुःखावल्या जातात. आपला संयम गमावून बसतात आणि मग हिंसाचाराला निमंत्रण मिळतं. पण मुळात समाजाची नस ओळखणारे काही समाजकंटक केवळ समाजात अशांतता पसरविण्यासाठी सामाजिक व धार्मिक आधारावर ध्रुवीकरण करण्यासाठी अशाप्रकारचे छायाचित्र व चित्रफित सोशल मीडियावर व्हायरल करत असतात आणि सोशल मीडियाच्या आधीन झालेला समाज त्याला बळी पडतो. फक्त एका बनावट चित्रफितीमुळे उत्तरप्रदेशातल्या मुझफर नगरमध्ये धार्मिक दंगली २०१३ मध्ये झाल्या होत्या.

अमृतसरमध्ये झालेल्या रेल्वेदुर्घटनेमागे एक कारण सोशल मीडियाचं होतं. रेल्वेदुर्घटनेच्यावेळी रेल्वेच्या पटरीवर उभं राहून लोकं युट्यूब व फेसबुक लाईव्हवर रावणदहनाची दृश्य दाखवण्यात मग्न होते आणि त्यामुळे त्यांना रेल्वेचा भोंगासुद्ध ऐकू आला नाही आणि आपला जीव गमावून बसले. सोशल मीडियाच्या आभासी विश्वात जगणाऱ्या या तरुण पिढीचा माणुसकी, दया करुणा ही मुलभूत तत्त्वसुद्धा कुठेतरी हरवली आहेत. आज आपल्या घरात अशी परिस्थिती आहे की संपूर्ण कुटूंब एका ठिकाणी बसलेलं असलं तरी त्यानां एकमेकांबद्दल बोलायला वेळ नसतो. ते सर्वजण मनाने सोशल मीडियाच्या आभासी विश्वात रममाण झालेले असतात. त्यामुळे कुटूंबातील संवाद हरवला आहे आणि त्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांत वाढ झाली आहे आणि कुटुंबव्यवस्थेला यामुळे धोका निर्माण झाला आहे. सोशल मीडिया देशाच्या सुरक्षितेसाठी सर्वांत मोठी डोकेदुखी ठरत आहे. इसिससारख्या दहशतवादी संघटना सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांना आपल्या जाळ्यात अडकवत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुण पिढीला आर्थिक व मानसिकरित्या फसवण्याचे प्रकार देखील घडत आहेत.

अशाप्रकारे समाज हा सोशल मीडियाच्या आधीन होऊन जाणं ही सगळ्यात मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर हा मर्यादित व गरजेनुसारच व्हायला हवा. आपलं व्यसन होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. सोशल मीडियाच्या आभासी जगातून बाहेर पडून वास्तवात जगायला शिकायला हवं. सोशल मीडिया हे केवळ एक साधन असून ते आपल्या नियंत्रणात असायला हवं आपण सोशल मीडियाच्या नियंत्रणात नाही. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर योग्य तेथे पण मर्यादित स्वरूपातच व्हायला हवा. कारण, 'अति तिथे माती' या प्रचलित म्हणीनुसार कुठल्याही गोष्टीचा अतिरेक झाल्यास नुकसानच होते हे लक्षात घ्यायला हवे.

❀❀❀

का होऊ नारायण ?

नराचा व्हावा नारायण हा का धरावा ध्यास
माणसाचा माणूस झाला तरी होईल बास !
हरलो-जिंकलो तरी आनंदाने जगूया प्रत्येक तास,
अजूनही दरवळतो आसमंतात स्नेहाचा-प्रेमाचा सुवास.
उगाच म्हणतात माणुसकीचा होत चालला -हास,
नका होऊ अंधश्रद्धेचे दास.
भूकबळींच्या अंगावर नाही मूठभर मांस,
तुमच्याकडे जे आहे तेही आहे फारच खास.
नराचा व्हावा नारायण हा का धरावा ध्यास,
माणसाचा माणूस झाला तरी होईल बास...

– राजेश चंद्रकांत रिठे (एम.ए. भाग १)

GO TO INDEX

शिवरायांचे बालपण

शितल विठ्ठल चव्हाण (११ वी)

इतिहासाच्या पानो-पानी अमर असे शिवप्रभूंची गाथा।
अभिमानाने मर्द मराठी, झुकतो त्यांच्या चरणी माथा।।

महाराष्ट्राच्या प्रत्येक ओठांवर, नसानसांमध्ये घुमणारा, दऱ्याखोऱ्यांतून उसळून वर येणारा व प्रत्येक मराठी माणसांच्या मनावर राज्य करणारा राजा म्हणजे श्री. छत्रपती शिवाजी महाराज. महाराष्ट्रातील या लाल मातीमध्ये शिवरायांची गर्जना, प्रेम, माया, अपार कष्ट व स्वराज्याविषयी ममता दडलेली आहे.



सूर्य अस्ताला गेला
सायंकाळ झाली
सूर्य अस्ताची अनेक
किरणे शिवनेरीत आली.
१९ फेब्रुवारी हा दिवस अमर झाला.
याच तर दिवसाला
शिवबाळ जन्माला आला.

शिवनेरी धन्य झाली. शिवबाळ जन्मला. येताच सर्वत्र एक विशिष्ट तेजोमय प्रकाश पसरला होता. ज्योतिषाचार्य शिवबांची पत्रिका बनवत असताना निःशब्द झाले. त्यांना काय बोलावे हेच सुचेना. कारण त्या पत्रिकेत महाराष्ट्राचं भाग्य दडलं होतं. ओसाड पडलेल्या स्वप्नाला हिरवळीनं दाटणारे हात जन्माला आले होते. पत्रिका बघताच ज्योतिषी म्हणाले की, बाळ मोठे भाग्यवान आहे. हा मुलगा सत्तावान व निष्ठावान होईल. या बाळाचा पराक्रम अमर राहील. व या महाराष्ट्राचा इतिहास कोणी पडताळून पाहिला तर सर्वप्रथम याच बाळाचे नाव त्यांच्या मुखाशी येईल.

शिवाजी हे अत्यंत हुशार, चलाख, बुद्धिमान, आत्मविश्वासू, भयमुक्त व चारित्र्यसंपन्न होते. त्यांच्या या सर्व कलागुणांना वाव देणारी त्यांची गुरु म्हणजेच त्यांच्या आई, राष्ट्रमाता जिजाऊ शहाजी भोसले. जिजाऊ या जाधव घराण्यातील होत. त्या अतिशय प्रेमळ, हुशार, धाडसी व सर्वांना योग्य मार्ग दाखविणाऱ्या होत्या. जिजाऊ या शिवबाळला नेहमी धाडसी, शूर व्यक्तित्त्वाच्या गोष्टी ऐकवत असत. शिवबाळ यांना झोप येत नसेल तर त्या अंगाई ऐकवत; परंतु, त्या अंगाईमध्येही अतिशय संताप लपलेला असे. जिजाऊ या शिवबाळाला नेहमी एकच गोष्ट ठामपणे सांगत असत की, आपल्याला या राष्ट्रातील गुलामगिरी, लाचारी व भीती दूर करायची आहे.

वीर जिचा मुलगा
धन्य ती आई
नाव तिचे जिजाऊ
ती शिवरायांची आई

शिवराय हे खेळप्रेमी होते. त्यांना अनेक खेळ खेळण्यास गंमत वाटे. शिवराय हे असे तसे खेळ न खेळता एखादा किल्ला सर करणे, कधी शिकार, तर कधी घोड्यावर बसून रानावनात दौडावे असे खेळ खेळत. एके दिवशी शिवराय व त्यांचे सवंगडी खेळ खेळत होते. व त्यामध्ये अतिशय रंगून गेले होते. संध्याकाळ झाली होती. त्यामुळे जिजाऊंनी शिवबाला आवाज देऊन घरात येण्यास सांगितले; परंतु, कोणीही जिजाऊचे ऐकत नव्हते. त्यामुळे शिवराय व त्यांच्या सवगंड्यांना घाबरवण्यासाठी जिजाऊ म्हणतात, बघा बघा मागून बागुलबुवा येत आहे. ते तुम्हांला उचलून नेतील. पळा, पळा नाहीतर तो उचलेल तुम्हांला; परंतु त्यांमध्ये कोणीही घाबरलं नाही. उलट शिवराय मोठ्या आवाजात म्हणतात, 'कुठे आहे तो बागुलबुवा?' त्याला मी ठार मारून टाकेन. हे उद्‌गार शिवरायांच्या बालपणातच ऐकून जिजाऊंना अभिमान वाटला व डोळे भरून आले. जिजाऊ त्यांना घरात घेऊन जातात व पानावर बसवतात.

त्यांचे खेळ होते लई भारी
ते खेळात ना कधी हारी
कधी घोडस्वारी तर
कधी किल्ले सर करी

शिवरायांना शिक्षणाची फारच आवड होती. त्यांच्या पहिल्या गुरु बनल्या जिजाऊ. जिजाऊंनी शिवरायांना नेहमी योग्य शिक्षण दिले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिजाऊंनी पूर्ण केले. पुढील शिक्षण हे स्वतः व्यापारामध्ये जाऊन निरीक्षण करून, अनुभव घ्यायचे होते. म्हणून जहागिरीत जाऊन तेथील प्रजेशी कसे वागतात. कुलकर्णी, देशमुख, पाटील यांच्यावर लक्ष कसे ठेवतात, पैशाचा हिशेब, गावाची स्वच्छता, शिक्षणव्यवस्था या सर्व गोष्टींकडे कसे लक्ष देतात, ते प्रत्यक्ष पाहून शिवबा शिकावेत म्हणून कधी जहागिरदाराच्या गावी पाठवीत. कधी पायी तर कधी घोड्यावरून जिजामाता त्यांना पाठवत असत. जिजाऊ या शिवरायांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाच्या भूमिका बजावत होत्या. शहाजीराजे भोसले हे शिवरायांचे वडील होते. ते मोठे सरदार होते. त्यामुळे ते शिवरायांना कमी वेळ देत असत.

जन्म दिला तिजने।
तिनेच ठेवले शिक्षण, शिवबांचे सुरू।।
धन्य ती माता जिजाऊ।
झाली शिवबांची गुरू।।

शिवराय हे धाडसी, पराक्रमी, नीतिमूल्य जपणारे व योग्य त्या व्यक्तीला न्याय मिळवून देणारे म्हणून ओळखले जात. त्यासोबतच ते चारित्र्यसंपन्नही होते. त्यांनी नेहमी आदरभावना जोपासली. शिवबांच्या पूर्वीच्या काळात स्त्रीला व तिच्या अब्रूला काडीची किंमत नव्हती. एके प्रसंगी रांजेगावच्या बाबाजी भिकाजी गुजर या पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या मुलीला भरदिवसा सर्वांसमक्ष उचलून नेली. ही बातमी शिवरायांना कळताच वयाच्या चौदाव्या वर्षीच त्या पाटलाचा चौरंग केला. (चौरंग म्हणजे हातपाय कलम करणे.) हा जर कायदा आता लागू असता, तर देव जाणे असे किती चौरंग रोज झाले असते.

या शिवबाच्या योग्य न्यायाची खबर प्रदेशात पसरली. जनतेमध्ये आनंदाची लहर पसरली व सुरक्षितेची भावना निर्माण झाली. जनतेला वाटू लागले की, आपल्या न्यायाचा विचार करणारा भावी राजा आपल्याला भेटला.

स्त्रियांचा सन्मान करी।
स्त्रियांचा राखी मान।।
जिजा माउलीने जन्म दिला।
सर्व माउलींना शिवबाचा अभिमान।।

शिवराय हे जन्माला आलेच होते. एका विशिष्ट कार्यासाठी, स्वराज्य स्थापन करणे हे त्यांचे स्वप्न व जिद्द होती. व त्यांनी ती जिद्द पूर्णही केली. त्यांना उत्तम असे मावळातील सवंगडी प्राप्त झाले. त्यांच्या सहकार्याने शिवबांनी आपले स्वराज्य स्थापनेचे स्वप्न पूर्ण केले.

स्वराज्य स्थापन करेल हा
बाजी लावून जीवाची,
देते वचन मी आज
माउली या शिवाची
राजे छत्रपती शिवाजी
राहील सदैव स्मरणांत
राजे शिवरायांची कीर्ति
हर-हर महादेव गर्जत
इथे लढली मर्दानी छाती
राजांसह लढा दयायचे मावळे
गनिमांना मोठ्या शर्थीने
पावन महाराष्ट्राची धरती
अमरवीर बलिदानाने !

❀❀❀

निसर्गसौंदर्य

कोण म्हणते मेल्याशिवाय
दिसत नाही स्वर्ग,
उघडा डोळे, करा विचार-
काय कमी आहे निसर्ग ?
मातेप्रमाणे माया करतो
मातीचा प्रत्येक कण,
पित्याप्रमाणे रक्षणाचे
छत धरते गगन !
चिवचिवणारे पक्षी उडतात
घेऊन स्वातंत्र्याचे पंख,
खळखळ करत नदी वाहते
संपवित सर्वांची खंत
सुंदर निळे डोंगरही
शिखरे उंचावून पाहतात,
प्रचंड समुद्रातील जीव कसे
चपळाईने पोहतात !
उभे राहतात डौलात वृक्ष
जीवसृष्टी घेऊन हाती,
चंद्र, सूर्य, तारे उगवतात
निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी

– **उत्कर्षा महेश विधाते** (११वी-I)

आई

सुंदरतेचा सागर असतो
तिच्या चेहऱ्यामध्ये,
ममतेचे हे विशाल गगन
तिच्या बोलण्यामध्ये
मनापासून वंदन तुजला
आशीर्वाद मला लाभला
तुझ्या या प्रार्थनांचे फळ
मिळते आज मजला
तूच माझी सोनपरी
तूच माझी GOD खरी
आनंदात सदा राहो
आई, तू आणि तुझी ही परी



– **सायली कंजाळ** (११वी-G)

GO TO INDEX

मॉडर्न महाविद्यालयातील माझा अनुभव

आकांक्षा शिंदे, तृतीय वर्ष, कला शाखा विशेषस्तर : मराठी

तृतीय वर्ष कला २०१८ आज महाविद्यालयातील पहिला दिवस. पहिला दिवस असल्याने शिक्षकांनी वर्षभराच्या अभ्यासक्रमाची माहिती दिली. आज नेहमीपेक्षा जरा जास्तच गर्दी महाविद्यालयात जाणवत होती. प्राचार्य कक्षाच्या बाहेर, प्राचार्यांच्या भेटीसाठी प्रतिक्षेत असलेले पालक व विद्यार्थी अर्थात, हे सगळे महाविद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी आले होते. काही विद्यार्थी अजूनही या महाविद्यालयात प्रवेश मिळेल या आशेवर बसले होते. पालक व विद्यार्थी यांच्या चेहऱ्यावरील तणाव स्पष्ट जाणवत होता. हे सर्व पाहून माझं मनही भूतकाळात घुटमळू लागलं. मीही मागच्या वर्षी या प्रक्रियेतून गेले होते. पहिल्या वर्षी मॉडर्न महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्याने मी दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेतला होता, पण मनाने कुठेतरी पक्का ध्यास घेतला होता की, मॉडर्न कॉलेजमध्येच शिकायचे. म्हणून द्वितीय वर्ष सुरू होऊन १५ दिवस उलटून गेल्यानंतरही आधीच्या महाविद्यालयात प्रवेश न घेता मी मॉडर्नमध्ये प्रवेश मिळवण्याच्या प्रयत्नात होते. मला विशेष विषय म्हणून इंग्रजी घ्यायचा होता, पण जागा शिल्लक नव्हत्या. कला शाखेच्या उपप्राचार्य ओक मॅडम यांना प्रवेश मिळण्याबाबत विनंती करत असताना मॉडर्न कॉलेजच्या मराठी विषयाच्या विभागप्रमुख प्रा.डॉ. निशा भंडारे मॅडम भेटल्या. त्यांनी माझा रिझल्ट पाहिला. टक्केवारी पाहिली आणि म्हणाल्या, ''मराठी विषयातही उत्तम गुण आहेत. विशेष विषय म्हणून मराठी का घेत नाही?'' या प्रश्नाचे माझ्याकडे काहीच उत्तर नव्हते. त्यानंतर त्यांनी मराठी या विषयामध्ये पुढे काय काय करिअरच्या संधी आहेत याविषयी माहिती दिली. मला आधी वाटायचं मराठी घेऊन काय करणार. हा माझ्या मनातील न्यूनगंड मॅडममुळे दूर झाला. मराठी हा विषय घेऊन मी मॉडर्न महाविद्यालयात प्रवेश घेतला. प्रवेशप्रक्रिया सोपस्करीत्या पूर्ण झाली ती महाविद्यालय कार्यालयातील कला शाखेचे अमित वाळवी यांच्यामुळे, यासाठी त्यांचे विशेष आभार.



द्वितीय वर्ष कला खूप छान सुरू झालं आणि कधी वर्ष संपलं हे समजलंदेखील नाही. या एकाच वर्षात मला खूप काही मिळालं. प्रा.डॉ. निशा भंडारे, प्रा. जाधव मॅडम, प्रा.डॉ. अपिने सर, प्रा. कुलकर्णी सर असे अनुभवी व उत्साही शिक्षक मिळाले. या सर्वांनीच खूप मार्गदर्शन केलं व अजूनही करतात. कधीही कोणत्याही अडचणी असल्या, तरी या सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाने त्या दूर होतात. मला पुढे प्राध्यापिका व्हायचं आहे यासाठीही मराठी विभागातील सर्व शिक्षक मोलाचं मार्गदर्शन करतात. काय वाचन करावं, कसा अभ्यास करावा अगदी इथपासून नेट/सेट, पीएच.डी.च्या संदर्भातही माहिती देतात.

मी खूप शांत स्वभावाची मुलगी आहे. कधी मी कुठेच नेतृत्व केलं नाही, पण या महाविद्यालयात प्रथमच मी एन.एस.एस.मध्ये गटप्रमुख म्हणून काम केलं.

भविष्यात पुढे काय करणार? याचा कोणताही विचार केला नव्हता, पण येथे आल्यानंतर मराठी विभागातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मी घडू लागले. विचारांना एक दिशा मिळाली. मी व्यक्त होऊ लागले. नेतृत्व करायला शिकले आणि खरंतर प्रा.डॉ. निशा भंडारे यांच्या प्रेमळ स्वभावाने मी स्वत:ला ओळखू लागले. मीही काहीतरी करू शकते असा आत्मविश्वास निर्माण केला.

मी स्वत:ला खूप नशिबवान समजते की, मला मॉडर्न महाविद्यालयात शिकण्याची संधी मिळाली.

मॉडर्नमधील सर्व शिक्षक व प्राचार्य राजेंद्र झुंजारराव सर नुसते विद्यार्थी घडवत नाहीत, तर देशाचा एक जबाबदार नागरिक म्हणून त्यांना घडवत असतात.

एका चतुरस्र व्यक्तिची मुलाखत...

२७ फेब्रुवारी २०१९ मराठी भाषा गौरवदिनाचे औचित्य साधून मॉडर्न कॉलेज, पुणे ५, येथे एम.ए. च्या वर्गात **श्री. राजेश रिठे** यांनी हजरजबाबी व संवेदनशील व्यक्ती अशी स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार **श्रीमती स्वाती महाळंक** यांची मुलाखत घेतली –

प्रश्न : पत्रकारितेशी तुमचे नाते कसे जुळले ते सांगा.

उत्तर : माझ्या घरातच वाचनाचं आणि लिखाणाचं बीज होतं, माझी आजी, आई–वडील या ना त्या विषयावर बोलत, सांगत आणि त्याच प्रेरणा माझ्या झाल्या.

प्रश्न : आकाशवाणी व दूरदर्शनचा आपला अनुभव व उपयुक्तता सांगावी.

उत्तर : आजची सर्वांत सुंदर आणि सरकारची शाश्वत माध्यमे आहेत. ज्याच्यामुळे लोकसंपर्क आणि त्यांच्याशी संवाद साधता आला. ही साधने जनहितार्थ आहेत आणि त्याचा मी एक भाग ठरले याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

प्रश्न : आपण विविध संस्थांशी जोडल्या गेल्या आहात, त्या उपक्रमांची माहिती जाणून घ्यायला आवडेल.

उत्तर : मी सरकारी माध्यमांच्या सोबत कार्यरत असल्यामुळे अनेक नामवंत संस्थांबरोबर काम करता आले. त्यातल्या त्यात वृक्षसंवर्धन – पर्यावरणासाठी काम करणाऱ्या संस्था. परदेशी शिष्टमंडळ जसे जपानी भाषेसाठी काम करणारे आणि पुण्यातले म्हणाल तर रामभाऊ म्हाळगी प्रतिष्ठान. अशांबरोबर मी संलग्न आहे.

प्रश्न : सन २०१६–१७ मध्ये आपली एक दोन नव्हे तर तब्बल ५ पुस्तके प्रकाशित झाली. त्याबद्दल काय सांगाल.

उत्तर : हा एक मोठा योगायोग ठरला. तसे प्रत्येक कार्यावर दीड–दोन वर्षांपासून काम करत होते, पण प्रकाशन मात्र एकाच वर्षात झाले. मला त्याची नावे सांगायला आवडेल

(१) कहानी बचतगटाची

(२) निःस्वार्थी जन नेता – डॉ. अण्णा हजारे यांचे आत्मचरित्र (लहान मुलांसाठी)

(३) आम जनता आपनेता – अरविंद केजरीवाल आणि देशातील प्रादेशिक पक्षांची वाटचाल.

(४) रेडिओ जॉकी व्हायचंय – या विषयावरील मराठीतील पहिले पुस्तक

(५) ध्येयासक्त – ज्येष्ठ राजकीय नेते दिलीप वळसे पाटील यांच्या राजकीय कारकीर्दीचे चित्रण.

प्रश्न : अभिनंदन मॅडम, पण याचबरोबर माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्यावरही आपण पुस्तक लिहिले याबाबतचा काय अनुभव होता.

उत्तर : देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील याच देशातील आणि मराठीतील पहिले चरित्र 'प्रतिभा पर्व' या नावाने प्रकाशित झाले. हे मी माझे सौभाग्य समजते. माणूस जितका उत्तुंग शिखरावर जातो तितका तो आपल्या मूळाला जोडलेला असतो, याचा अनुभव आला. जीवनपर्व जाणताना मीच अनुभव समृद्ध झाले.

प्रश्न : आपण आजपर्यंत किती मुलाखती घेतल्या त्यातली अविस्मरणीय कोणाची वाटते.

उत्तर : तशा खूप घेतल्या असं वाटतं. आकडा पाचशेच्या जवळपास जाईल. अविस्मरणीय म्हणाल तर मला सुशीलकुमार शिंदे आणि अरविंद केजरीवाल यांची वाटते. एकाचा शून्यातून प्रवास शिखराकडचा, तर एकाचा सरकारी उच्चपदस्थाकडून – लोकांत जाऊन लोकनायक – आम जनतेचा प्रतिनिधी होण्याचा

प्रश्न : पत्रकारिता या क्षेत्रात उपलब्ध संधीबद्दल काय सांगाल.

उत्तर : मूळात भाषेवर प्रभुत्व हवे. मग खूप मोठे अवकाश आहे. तसं म्हणाल तर – उद्घोषक म्हणून रेडिओ क्षेत्रात, मराठी भाषांतर करणे, मुद्रित शोधन, निवेदन, प्रकाशन संस्थेत, दुभाषी म्हणून, समाज उपयोगी संस्थांतून लोकांना बोलीभाषेत संवाद साधण्यासाठी. सरकारी कार्यालयात देखील मराठी भाषा येणाऱ्यांना देखील खूप संधी उपलब्ध आहेत.

प्रश्न : मॅडम आपण पीएच.डी. करताय आणि तेही आमच्या कॉलेजच्या संशोधन विभागातून यासाठी आपणास शुभेच्छा देतो.
आजच्या संवादातून आम्हा विद्यार्थ्यांना खरंच खूप मार्गदर्शन मिळालं. ध्येयासक्त झाल्याशिवाय ध्येय गाठता येत नाही. त्यामुळे कष्ट करा, शिका आणि ध्येय गाठा. हा संदेश मिळाला. याबाबत खूप खूप धन्यवाद!

आनंदवन, हेमलकसा, सोमनाथ ... एक अविस्मरणीय अनुभव

चेताली विश्वनाथ गायकवाड (एम.ए. मराठी भाग – १)

आनंदवन, हेमलकसा, सोमनाथ यांच्याविषयी पुस्तकातून वाचलं होतं. पण हे सगळं पाहाण्याचा योग आम्हाला दिला तो आमच्या महाविद्यालयाने...! या ठिकाणांची कुठलीही जास्त माहिती नसताना आम्ही २ फेब्रुवारी २०१८, रोजी सर्वजण पुणे स्टेशन येथून अजनी एक्सप्रेसने अजनी येथे पोहोचलो. तेथून आम्हाला आनंदवनची गाडी घ्यायला आली. आम्ही ७ वाजता तेथे पोहोचलो. आनंदवन म्हणजे दिव्यांग व्यक्तींनी बनवलेली सुंदर बाग. आनंदवनात पाऊल ठेवताच मनाला सुखाचा स्पर्श झाला. आजूबाजूचं सुंदर निसर्गसौंदर्य पाखरांचा किलबिलाट आणि वाऱ्यावर डोलणारी फुलं हे पाहाताना एखादा गीतकार गाणं गातोय आणि ती फुले त्या गाण्यावर आपला ठेका धरून नृत्य करीत आहेत, असंच वाटत होतं.

आनंदवनात पोहोचल्यावर आम्ही चहा–नाश्ता घेतला. थोडासा आराम केला. आम्हाला आनंदवनाची सी.डी. दाखवली व त्यानंतर दुपारी जेवण करून आम्ही आनंदवन पाहायला निघालो. सर्वप्रथम आम्ही हातमाग सतरंजी, बॅग, सॅक बनविण्यासाठी असलेले विभाग पाहिले. त्यानंतर ग्रीटिंग कार्ड विभाग पाहाण्यासारखी गेलो. तो तर अतिशय सुंदर होता. मोराची विविध चित्रे पाहाण्यासाठी होती. टाकाऊतून



टिकाऊ अशा वस्तू पण तेथे होत्या. आम्ही तेथे थोडी खरेदी केली व आनंदवनचा 'स्वरानंदवन' ऑर्केस्ट्रा पाहायला गेलो. एका अंध मुलीने सुंदर गाणी म्हटली. ते गाण्याचे बोल अजूनही कानाशी रेंगाळतात. त्यानंतर रात्रीचे जेवण करून आम्ही विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून आम्ही 'बाबा आमटे आणि साधनाताई आमटे' यांचे समाधिस्थळ पाहिले व डॉ. भारतीताई विकास आमटे यांच्याशी मनसोक्त गप्पा मारल्या. त्यानंतर मेगा किचन पाहिले. विज्ञान तंत्रज्ञान वापरून केलेले आनंदवनातले मेगा किचन मोठ्या बायोगॅस यंत्रणेवर हे मेगा किचन चालते.

आनंदवनातून आमचा पुढचा प्रवास सुरू झाला तो 'हेमलकसाचा' आजूबाजूला गर्द जंगल आणि मध्ये रस्ता. एखाद्या जंगल सफारीला चाललोय असा तो अनुभव होता. जाता–जाता आम्हाला लांडग्याचे दर्शन झाले. आम्ही सर्वांनी रात्री हेमलकसाची सी.डी. पाहिली. नंतर विश्रांती घेतली. सकाळी लवकर उठून न्याहारी व चहा घेतला आणि हेमलकसा पाहायला निघणार इतक्यात अचानक डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाताई आमटे यांची भेट झाली. त्यांनी आमच्याशी ओळख करून घेतली आणि आमच्या प्रश्नांना त्यांनी मनमोकळेपणाने उत्तरे दिली. त्यानंतर डॉ. प्रकाश आमटेंसमवेत तेथील प्राण्यांची भेट घेतली. वाघ, हरीण, कांचनमृग, साळिंदर, पोपट, मांजर, माकड खारुताई, गाय, नीलगाय, मोर, अस्वल, कासव यांचे दर्शन घेतले. प्रकाश आमटे यांचे प्राणिप्रेम पाहून मन भारावून जातं. त्यांची नातसुद्धा वाघाच्या अंगावर बसते. हे बघणंसुद्धा किती भीतिदायक होतं. आदिवासींनी तयार केलेल्या शोभेच्या वस्तू पाहिल्या व घेतल्या. त्या वस्तू त्यांनी बांबूपासून तयार केल्या होत्या. आम्हाला डॉ. प्रकाश आमटे व मंदाकिनी आमटे यांना किती गौरवानं सन्मानित करण्यात आले ते दाखवलं. त्यांना भारतरत्न हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. हा सोहळा मी दूरदर्शनवर पाहिला होता. त्यांनी आदिवासींसाठी खुला केलेला दवाखाना पाहिला. तसेच तेथील शाळांमध्ये संगणकसुद्धा शिक्षक शिकवतात. तेथे मैदानी खेळ मुलं खेळत होती. असं हे भारतरत्नाचं हेमलकसा तसेच तेथील नदीकिनारी प्रकाश आमटे व मंदाताई आमटे रोज एकमेकांशी हितगुज करत त्याच ठिकाणी आम्ही गेलो. तेथे आम्ही पाहिले प्रत्येक भिंतीवर वारली चित्र रेखाटलं होतं. असंच सुंदर चित्र मनात रेखाटून आमची गाडी वळाली ती सोमनाथला...! रात्री उशिरा पोहोचल्यामुळे आजूबाजूचं दृश्य पाहाताच आलं नाही. रात्री जेवण करून आम्ही विश्रांती घेतली. पहाटे उठून आवरून बसलो. उगवता सूर्य डोंगराआडून आम्हाला दर्शन देत होता. ते पाहून सगळ्यांनाच

आनंद झाला. आम्ही सोमनाथचा परिसर पाहायला गेलो तिथे विविध प्रकारची झाडे आणि वनस्पती होत्या. तसेच सेंद्रिय खतापासून निर्माण केलेली शेती आणि त्या शेतातून दुसऱ्या शेतात जाण्यासाठी छोटीशी पायवाट...! पाण्यासाठी बांधलेला बंधारा आहे आणि तसेच त्यात सिमेंट आणि प्लॅस्टिक यांचे एकत्रीतकरणसुद्धा आहे. हे पाहून आम्ही थक्कच झालो.



पावसाच्या पाण्याचा एक थेंबही वाया जाऊ नये अशी योजना डॉ. विकास आमटे यांनी तेथे अमलात आणलेली आहे. बाराशे एकरांचा तो परिसर आहे. हंगामी पीक लागवडीसाठी चाळीस एकर एवढा भाग व्यापला जातो. त्या प्रत्येक एकरात टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, वांगी यांची पिके घेतली जातात आणि आसपासच्या परिसरातील लोक व्यवसायासाठी किंवा रोजगारासाठी येत असत. पाण्याचे नियोजन कसे करावे ते येथे येऊन कळते. जर अशी संकल्पना प्रत्येकाने आपल्या गावात किंवा शहरात आखली, तर दुष्काळासारखा भीषण प्रश्न आपल्याला सतावणार नाही. नंतर आम्ही आमच्या परतीच्या प्रवासाला निघालो. या प्रवासात आम्हाला फारच नवनवीन अनुभव आले. या प्रवासात एकूणच आम्हाला फारच मज्जा आली. आमच्यासोबत तैवानच्या तीन विद्यार्थिनी होत्या. त्यांच्याशी गप्पा मारताना मज्जा यायची. ट्रेनमधून दिसणारे निसर्गाचे सुंदर दृश्य पाहायला मिळाले. आम्हाला हा सुंदर अनुभव अनुभवायला मिळाला, तो आमच्या महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. झुंजारराव सर आणि प्रा. नरेंद्र नायडू सरांमुळे. आमच्यासोबत आनंदवन मित्रमंडळ, चिंचवडचे धम्मसागर उजागरे आणि स्वप्नील जगताप हे दोघे मॉडर्नचे माजी विद्यार्थी सहलप्रमुख म्हणून होते. असा हा आमचा जगण्याचा नवा अर्थ शिकवणारा आनंददायी अविस्मरणीय प्रवास...!

प्रसिद्धी

सागर मोहन नाईकवाडे (एम.एस.सी. रसायनशास्त्र (वर्ष २ रे)

'प्रसिद्धी' हा शब्द जरी आपल्या आसपास आला तरी तो ऐकायला, बोलायला आणि पहायला आपणा सर्वांना खूप छान वाटत. ही अशी गोष्ट जी सर्वांना हवीहवीशी वाटते आणि कोणालाही त्यापासून दूर रहावस वाटतं नाही .पण ही काही प्रत्येकाच्या वाट्याला येत नाही. प्रसिद्धी च्या प्रत्येकाने विविध व्याख्या बनवल्या आहेत .साधारणतः प्रत्येकाच्या मनात पहिल्यांदा येतं की प्रसिद्धी ही फक्त चित्रपट, अभिनय त्यातील अभिनेते किंवा अभिनेत्री यांच्या भोवती फिरत असते. तेही काही अंशी बरोबर आहे. कारण ते लोक आपलं मनोरंजन करत असतात .पण प्रसिद्धी हा शब्द फक्त येवढ्या पर्यंतच सीमित आहे का? तर नाही. माझ्या मते समाजामध्ये बरेचसे लोक प्रामाणिक पणे उत्कृष्ट काम करत असतात. फक्त स्वतःकडे न पाहता ते विविध समस्या सोडवण्याचा प्रयत्न करीत असतात. त्या लोकांना प्रसिद्धी ची गरज नसते ती आपोआप अनपेक्षितपणे त्यांच्या जवळ येत असते .

प्रसिद्धी हि अशी गोष्ट आहे की ती मिळणं खूप सोपं आहे पण टिकवणं फार अवघड. कारण तुम्ही ज्या वेळेस लोकप्रिय असता तेव्हा लोक तुम्हाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत असतात आणि या गोष्टीं कडे तुम्हाला थोडसं दुर्लक्ष करावं लागतं कारण त्या शिवाय तुम्हाला जमिनीवर राहता येत नाही. पॉप्युलेरिटी ही अशी चीज आहे की ती कशी तुम्हाला जपायला लागते आणि त्या पासून तुम्हाला खुप अलिप्त रहाव लागत कारण अगोदरचे सगळे संदर्भ पाहता खूप लोकांना प्रसिद्धी ही मिळाली. काहींनी ती पचवली काहींना ती पचवता नाही आली.

पण पॉप्युलेरिटी म्हणजे फक्त काही त्या व्यक्तीच्या दिसण्यावरून असू शकत नाही तो एक विश्वासाचा ही भाग असू शकतो. पण आपण त्याच्याकडे फक्त एक व्यक्तिमत्व म्हणून पहात असतो. पण मला असं वाटतं की फक्त तसं न पाहता त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातून आलेला विचार ही तितकाच महत्वाचा आहे. काही लोक त्यांच्या विचारावर ही प्रेम करत असतील किंवा एखादा व्यक्ती ज्या प्रकारे ती गोष्ट मांडतो किंवा चुकीच्या गोष्टींवर ज्या प्रकारे आक्रमक होतो त्याही गोष्टीच लोकांना आकर्षण असू शकत. म्हणून प्रत्येक वेळेस बाह्यव्यक्तिमत्त्वावरून प्रत्येक गोष्टीला महत्व दिल जाऊ शकत नाही .त्याला ही एक स्वतः चा विचार असायला हवा .

आपल्या देशामध्ये प्रसिद्धी कशाला आणि किती द्यावी याच ही काही वेळेस भान रहात नाही. आपण उगाचच त्या गोष्टी व्हायरल करत सोडतो. भारतात विराट कोहली, महेंद्रसिंह धोनी, रोहित, पंड्या असे अनेक क्रिकेटपटू नेहमीच प्रसिद्धीझोतात असतात, असावेत याबाबत दुमत नाही. वर्ल्डकप फुटबॉल, विम्बल्डन चॅम्पियनशिप असली की रोनाल्डो, मेस्सी, रॉजर फेडरर यासारख्या विदेशी खेळाडूंची चर्चा होते. मात्र आपल्या देशात असे काही खेळाडू आहेत की , ज्यांनी मोठी

सिद्धी कमावलेली असली तरी त्यांना फारशी प्रसिद्धी मिळत नाही .हे खेळाडू राष्ट्रीय –आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळतात .त्यात त्यांनी अनेक पदके कमावली. परंतु त्यांच्या वाट्याला कायम कौतुकापेक्षा उपेक्षा आणि सहानुभुतीच जास्त आली, कारण ते खेळाडू विकलांग आहेत म्हणुन. या खेळाडूंना सर्वप्रथम त्यांना वेगळ ठरवत असलेल्या मानसिकतेच्या विरोधात सामना करावा लागतो आणि नंतर आपल्या प्रतिस्पर्धी व्यक्तीशी.

त्यातलीच अनेक नाव आणि त्यांची गोष्ट थोडक्यात पाहूया,

१) आदिल अन्सारी याचा किशोरवयीन वयात असतांना अपघात झाला. त्याला घाम येत नसे आणि त्यामुळे शरीराच तापमान संतुलित ठेवण्यासाठी सतत तोंडावर पाणी माराव लागत असे, यासाठी त्याला दुसऱ्याची मदत घ्यावी लागे. कारण त्याचे दोन्ही हात खांद्यापासून वर जात नसत आणि तरी या आदिलने तिरंदाजी मधे देशाला सुवर्णपदक आणून दिल आहे.

२) मानसी जोशी ही बॅडमिंटन प्लेयर आहे. ही दुचाकी वरून जात असतांना अपघात झाला. ट्रकने उडवले आणि तिला डावा पाय गमवावा लागला आणि तिने कृत्रिम पाय बसवला. अशा खडतर परिस्थीतीतून उभी राहिली आणि देशाला सुवर्णपदक आणून दिलं.

३) कार्तिकी पटेल हिची तर कहानी खूप चित्तथरारक आहे. पॅराप्लॅजिक वुमन बास्केटबॉल ची कप्तान आहे आणि स्कूबा डायव्हर सुध्दा आहे . .हीचाही गुजरातला जात असतांना कार अपघात झाला त्यामधे कमरे खालचा संपूर्ण भाग लुळा झाला. पण तरीही न खचून जाता परत जिद्दीने उभी राहिली आणि देशाच नाव उंचावते आहे.

